# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

॥ आदित्य हृदयम् ॥

एमईआरसी



## वार्षिक अहवाल २००६ - २००७

जयति जयति सूर्याः सप्त लोकैक दीपः
किरणम् इति तथापः सर्व दुःखस्य हर्ता।
अरुणकिरण गम्याश्चधीर आदित्यमूर्तिः
परम परम दिव्यः भास्कराष्टम नमामि ॥



डॉ. प्रमोद देव
अध्यक्ष



श्री. ए. वेलायुथम
सदस्य



श्री. एस.बी. कुलकर्णी
सदस्य

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| अध्यक्षांचे मनोगत | १ |
| सन २००६-०७ चा आढावा | २ |
| ग्राहक वीज मागणीचे व्यवस्थापन (डीएसएम) आणि ऊर्जा बचत | २ |
| ऊर्जा बचतीची मोहीम | ३ |
| नियोजित भार नियमनात वाढ करण्याचा महावितरण कंपनीचा प्रस्ताव | ४ |
| वीज दरासंबंधीचे प्रश्न | ४ |
| बहु-वर्षीय वीज दराचे आदेश | ७ |
| महावितरण कंपनी, मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी, बेस्ट, टीपीसी आणि आरईएल करिता 'आकारांची अनुसूची' | ८ |
| पुणे सर्कलमधील भार नियमन शिथील करण्यासाठी होणारा अतिरिक्त खर्च रिलायेबिलिटी अधिभार म्हणून वसूल करण्यास मान्यता देण्यासाठी महावितरण कंपनीचा प्रस्ताव | १० |
| राज्य भार प्रेषण केंद्राचे आर्थिक वर्ष २००७-०८ साठी अंदाजपत्रक | ११ |
| विद्युत लोकपाल (ओम्बड्समन) | १३ |
| परिशिष्ट : १ - सन २००६-०७ मध्ये आयोगासमोर दाखल झालेल्या याचिका | १४ |
| परिशिष्ट : २ - आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये आयोगाने पारित केलेले आदेश | १८ |
| परिशिष्ट : ३ - ०१-०४-२००६ ते ३१-०३-२००७ कालावधीकरिता अलेखापरिक्षीत आय-व्यय पत्रक | २३ |

# अध्यक्षांचे मनोगत

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला सलग दुसऱ्या वर्षी म्हणजेच सन २००६-०७ मध्ये देखील तीव्र वीज टंचाईबाबतच्या समस्या हाताळाव्या लागल्या. जरी सन २०१२ पर्यंत सर्वांना विजेचा पुरवठा करण्याचा उद्देश असला तरी नजीकच्या काळात वीज टंचाई दूर होण्याची चिन्हे नसल्याचे आता पूर्णपणे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रात विजेची मुक्त व्यापार व्यवस्था विकसित करण्याचे आयोगाचे प्रयत्न आहेत. तथापि अशा प्रयत्नांना वीज टंचाई ही एक सततचे आव्हान आणि मोठा अडथळा ठरणार आहे.

आप-आपल्या राज्यात अधिकाधिक गुंतवणूक व्हावी म्हणून अन्य राज्यांत स्पर्धा चालू आहे. अशा परिस्थितीत, देशातील सर्वात जास्त औद्योगिकरण झालेल्या महाराष्ट्राला वीज टंचाई मुळीच परवडणारी नाही. याबाबतीत पराकाष्ठेचे प्रयत्न करुन देखील, वीज निर्मिती क्षमता वाढविण्याची गती, मागणी व पुरवठ्यातील तफावत कमी करण्यासाठी पुरेशी नाही. त्यामुळे वीज टंचाई अजूनही कमी झालेली नाही. सन २००६-०७ मध्ये, रत्नागिरी गॅस ॲन्ड पॉवर प्रोजेक्ट लिमिटेडकडून, राज्याला केवळ ३५० मेगावॉटच्या आसपास अतिरिक्त वीज उपलब्ध होऊ शकली. परिणामी, मागणी-पुरवठ्यातील तफावत सुमारे ५५०० मेगावॉट इतकी वाढल्याने भार नियमनात वाढ करणे आवश्यक झाले.

या वर्षी, वीज बचत करण्याची गरज असल्याची जाणीव ग्राहकांमध्ये निर्माण करण्याच्या दृष्टीने आयोगाने पुढाकार घेतला. याविषयी ग्राहकांमध्ये उत्साह आणि सहमती निर्माण करणे आयोगास शक्य झाले; त्याबद्दल आयोग निश्चितच समाधानी आहे. ग्राहकांच्या विजेच्या मागणीचे व्यवस्थापन होईल, याची खात्री होण्याकरिता आयोगाने अनेक उपाय देखील योजिले आहेत. विद्युत भार केंद्रीत असलेल्या ठिकाणी अतिरिक्त वीज निर्मिती क्षमतेत भर घालण्याकरिता प्रोत्साहन देणे, मल्टीप्लेक्स व शॉपिंग मॉल्स अशा ग्राहकांना जास्त वीज दर लावणे व ग्रीडमधील विजेच्या वापरासाठी अशा ग्राहकांना प्रोत्साहन न देणे, यासारख्या वीज मागणी व्यवस्थापनाच्या उपायांचा समावेश आयोगाने दिनांक १ एप्रिल, २००७ पासून सुरु केलेल्या बहु-वर्षीय वीज दरात केला आहे.

राज्य त्याचप्रमाणे देश गतिशील आर्थिक वाढीच्या युगाकडे वाटचाल करीत असताना, वीज बचत ही एका मर्यादेपर्यंतच उपयुक्त ठरु शकते. यावरुन, हे स्पष्ट दिसून येते की, वीज उपलब्धतेसाठी अधिकाधिक नवीन मार्ग शोधण्याची गरज आहे. सीआयआय-पुणे यांच्या परिसरातील पहिल्या ३० उद्योगांकडील स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांकडे ९० ते १०० मेगावॅट निर्मिती क्षमता उपलब्ध होती. या अतिरिक्त क्षमतेचा वापर करण्याच्या प्रस्तावाचा आयोगाने मागील वर्षी अभ्यास केला व पुण्यातील भार नियमन दूर करण्यासाठी, अंमलात आणला. अर्थातच, हा प्रस्ताव अंमलात आणणे निःसंशयपणे एक आव्हानच होते कारण, कोळशावर चालणाऱ्या पारंपरिक वीज निर्मिती प्रकल्पांच्या खर्चापेक्षा द्रव इंधनावर चालणाऱ्या स्व-वापरासाठीच्या प्रकल्पांचा वीज निर्मिती खर्च जास्त असतो. तथापि, पुणे मॉडेल मोठ्या प्रमाणावर स्वीकारार्ह असल्याचे आढळले आहे. स्थानिकरित्या उपलब्ध असलेल्या विजेचा वापर करुन किंवा विद्युत भार केंद्रीत असलेल्या ठिकाणी अतिरिक्त विद्युत क्षमता निर्माण करुन, भार नियमन दूर करण्याचा मार्ग दाखविण्यात, ते यशस्वी झाले आहे.

या पार्श्वभूमीवर, ज्या भागातील ग्राहक भार नियमनातून दिलासा मिळण्यासाठी अतिरिक्त रिलायेबिलिटी अधिभार भरण्यास तयार आहेत अशा भागाची विजेची मागणी पुरी करण्यासाठी, स्थानिकरित्या वीज निर्मितीच्या तत्त्वावर आधारित फ्रॅन्चायसी मॉडेलची योजना, आयोगाने शासनाला विचारार्थ सुचविली आहे. स्थानिक वीज निर्मितीवर आधारित वितरण फ्रॅन्चायसी मॉडेल हे विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत कायदेशीर चौकटीतील वितरण फ्रॅन्चायसी संकल्पनेचा विस्तार आहे. फ्रॅन्चायसीने यंत्रणेमध्ये भर घातलेल्या अतिरिक्त विजेकरिता रिलायेबिलिटी अधिभार, सीआयआय-पुणे यांच्या मॉडेल प्रमाणे, आयोग ठरवून देईल. त्यामुळे त्या भागातील वीज पुरवठ्यातील तूट भरुन काढण्यासाठी निरनिराळे पर्याय उपलब्ध होऊ शकतील.

नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनच्या वीज खरेदीच्या तपशीलाच्या चौकटी अंतर्गत (आरपीएस) नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनच्या वीज निर्मितीस उत्तेजन देण्यासाठी आयोगाने आणखी उपाय योजिले आहेत. या चौकटी अंतर्गत, आयोगाने निश्चित केलेल्या टक्केवारीने, वितरण कंपनी, स्व-वापरासाठीचा वीज निर्मिती प्रकल्पधारक त्याचप्रमाणे मुक्त प्रवेश ग्राहकांनादेखील नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनची वीज घ्यावी लागेल. नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनच्या वीज खरेदी तपशीलानुसार पहिल्या वर्षाकरिता, (२००६-०७) वीज खरेदी ३ टक्के असून सन २०१० पर्यंत ती ६ टक्के इतकी वाढेल. इमारतींच्या जंगलात राहणाऱ्या मुंबईतील ग्राहकांना 'हरित उर्जा' विहीत प्रमाणात पुरविण्यात येत आहे. तसेच हे ग्राहक पर्यावरण दूषित न करण्यास हातभार लावत आहेत, ही समाधानाची बाब आहे.

विद्युत अधिनियम, २००३ खाली नियुक्त केलेल्या विद्युत लोकपाल यांच्या कार्यालयाने, ग्राहकांना त्यांच्या गाऱ्हाण्याचे निवारण करण्यासाठी गतिमान, सोप्या व सुलभ मार्गाचा कार्यक्षम पर्याय देखील, अधिनियमात अभिप्रेत असल्याप्रमाणे, उपलब्ध करुन दिला आहे.

प्रमोद देव

**(डॉ. प्रमोद देव)**

## सन २००६-२००७ चा आढावा

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग अस्तित्वात आल्यापासूनचे हे सातवे वर्ष आयोगाच्या दृष्टीने आणखी एक आव्हानात्मक वर्ष ठरले कारण राज्यातील अभूतपूर्व वीज टंचाई अद्यापही चालू आहे.

राज्य तसेच समाजातील सर्व घटकांचे हित विचारात घेऊन वीज टंचाईची झळ कमी करण्यासाठी विद्युत कंपन्यांना मदत करणे त्याचबरोबर दीर्घ-कालीन तत्त्वावर ऊर्जा संवर्धन करण्याची गरज असल्याबाबतची जाणीव ग्राहकांमध्ये, विशेषतः मुंबईतील ग्राहकांमध्ये, निर्माण करणे, असा दुहेरी मार्ग आयोगाने अवलंबला. या बाबतीत एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे, विद्युत कंपन्यांनी मुंबईतील ग्राहकांकरिता ऊर्जा संवर्धनाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी एक मोहीमच हाती घेतली. ही मोहीम आयोगाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली असून ती सुलभतेने राबविण्यात आयोगाने सहाय्यही केले.

आयोगाने या वर्षी योजिलेले अन्य विविध उपाय-

- विद्युत अधिनियम, २००३ नुसार नूतनशील ऊर्जा स्रोतांपासून करावयाच्या वीज निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी नूतनशील ऊर्जा स्रोताचा दीर्घ-कालीन विकास आणि संबंधित नूतनशील ऊर्जा स्रोतांपासूनच्या वीज खरेदीच्या तपशीलाची चौकट प्रसिध्द केली.
- विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४६ अंतर्गत, प्रथमच विद्युत पुरवठा संहिता विनियमांनुसार, राज्यातील पाच वितरण परवानाधारकांची 'आकारांची अनुसूची' निश्चित केली.
- एप्रिल २००७ पासून बहु-वर्षीय वीज दराची चौकट महाराष्ट्रात लागू केली.
- मविनिआ (वितरण परवान्याच्या अटी) विनियम, २००४ अधिक्रमित करुन मविनिआ (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ अधिसूचित केले.
- राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकरिता आर्थिक वर्ष २००६-०७ आणि २००७-०८ साठी पारेषण दर निश्चित केले.
- विद्युत भार संशोधनाला चालना देणे आणि वीज मागणी व्यवस्थापनाद्वारे अधिक कार्यक्षम ऊर्जा मिळवून मागणी-पुरवठ्यातील तफावत कमी करणे; आणि
- विद्युत कंपन्यांकडून कोणत्या अपेक्षा ठेवण्याचा राज्यातील विद्युत ग्राहकांना हक्क आहे आणि हे हक्क बजावण्यासाठी ते काय करू शकतात, हे नमूद करणारे एक 'विद्युत ग्राहक हक्क विवरणपत्र' तयार करणे.

**आयोगाच्या बैठका**

डॉ. प्रमोद देव यांच्या अध्यक्षतेखाली, सदस्य श्री. ए. वेलायुथम आणि श्री. एस. बी. कुलकर्णी यांच्या उपस्थितीत, या वर्षात आयोगाच्या १८ बैठका झाल्या.

**राज्य सल्लागार समिती**

राज्य सल्लागार समितीची ७ वी बैठक दिनांक ९ ऑक्टोबर, २००६ रोजी झाली. या बैठकीत, ग्रामीण क्षेत्र जाहीर करण्याबाबतची घोषणा/अधिसूचना आणि राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना याबाबत चर्चा झाली.

भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने दिनांक २३ ऑगस्ट, २००६ रोजी 'ग्रामीण विद्युतीकरण धोरण' प्रसिध्द केले. या धोरणात, ''खेडे आणि पाड्यांसह सर्व क्षेत्रांना विजेचा पुरवठा करण्यासाठी संबंधित सरकारने प्रयत्न करावा'' या मुद्द्यावर भर देण्यात आला आहे. अध्यक्ष डॉ. प्रमोद देव यांनी राज्य सल्लागार समितीच्या सदस्यांना या विषयाबाबत त्यांची मते मांडण्यास सांगितले. राज्य सरकारने नेमलेल्या अब्राहम समितीने ग्रामीण क्षेत्र सीमांकित करण्याबाबत केलेल्या शिफारशींचा देखील त्यांनी उल्लेख केला.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(२) अंतर्गत राज्य शासनास आपल्या शिफारशी/सल्ला देणे आयोगाला शक्य व्हावे म्हणून 'ग्रामीण क्षेत्राची फेर आखणी करण्याबाबत' सदस्यांची मते त्यांनी जाणून घेतली. त्यानुसार, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. आरएडी-२००५/सीआर-४३४/एनआरजी-३ दिनांक २७ नोव्हेंबर, २००६ अन्वये विद्युत अधिनियम, २००३ च्या प्रयोजनार्थ ग्रामीण विभाग/क्षेत्र जाहीर केले आहे.

यापूर्वीच्या व्याख्येच्या आधारे १०० टक्के विद्युतीकरणाचे लक्ष्य साध्य झाल्याचे महाराष्ट्र शासनाने याआधी जाहीर केले होते. परंतु अलिकडील व्याख्येनुसार, ५५५४ गावांना, ज्यांची लोकसंख्या १८.७२ लाख आहे, अद्याप वीज पुरवठा करावयाचा बाकी आहे. या गावांना केंद्र शासनाच्या राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेखाली वीज पुरवठा करण्यात येईल.

## ग्राहक वीज मागणीचे व्यवस्थापन (डीएसएम) आणि ऊर्जा बचत

नवीन वीज निर्मिती केंद्रे उभारुन आणि सध्याच्या केंद्रांचे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण करुन वीज उपलब्धतेच्या क्षमतेत भर घालण्याचे प्रयत्न चालू असतानाच, तोटे कमी करण्याची तसेच अन्य स्रोतांकडून वीज घेण्याचे आयोगाने निर्देश देऊन त्याबाबतची प्रक्रिया सुलभ केली. तथापि, विजेची मागणी व पुरवठ्यातील तफावत वाढतच राहिल्याने, सन २००५-०६ मध्ये सूचित केल्यानुसार, विद्युत स्रोतांचे एकत्रित नियोजन करण्याचा एक भाग म्हणून, आयोगाने सर्व वितरण परवानेधारकांना ग्राहक वीज मागणी व्यवस्थापनाबाबतच्या योजना विकसित करण्याचा आणि त्यांचा समावेश वीज प्राप्त करुन घ्यावयाच्या त्यांच्या दीर्घ-कालीन धोरणात करण्याचे, आणखी निर्देश दिले. वीज ग्राहकांमध्ये विजेची बचत करण्याबद्दल जागृती निर्माण व्हावी यासाठी संयुक्तपणे एक मोहीम हाती घेण्यास, आयोगाने मुंबईतील विद्युत वितरण परवानेधारकांना सांगितले.

**पथदर्शक योजनेचा विकास**

वीज बचतीच्या आणि ग्राहक वीज मागणीचे व्यवस्थापन करण्याच्या क्षेत्रात पथदर्शक/प्रात्यक्षिके दाखविणाऱ्या योजना विकसित करण्यासाठी पाठिंबा देण्याकरिता स्वतःहून पुढाकार घेण्याचे आयोगाने चालूच ठेवले. यासाठी आयोगाने, रु. १.३४ कोटी एकूण खर्च असलेल्या बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट)च्या विजेच्या मागणीचे व्यवस्थापन करण्याची एक पथदर्शक योजना आणि रिलायन्स एनर्जी लिमिटेड (आरईएल) चा ग्राहक वीज मागणी व्यवस्थापनाचा एक प्रस्ताव, यांना मंजूरी दिली.

बेस्टच्या पथदर्शक योजनेत, इलेक्ट्रोमॅग्नेटिक बॅलास्टच्या ऐवजी इलेक्ट्रॉनिक बॅलास्टचा वापर केलेल्या कार्यक्षम-ऊर्जेवर आधारित प्रकाश योजना (जी पाच मोठ्या कार्यालयीन इमारतीत कार्यान्वित करावयाची आहे); गगनचुंबी निवासी/वाणिज्यिक इमारतीतील पाण्याच्या पंपांमधील ऊर्जा कार्यक्षमता योजना (जी १० गगनचुंबी निवासी/वाणिज्यिक इमारतींत कार्यान्वित करावयाची आहे); आणि बेस्टच्या अधिकाऱ्यांकरिता पाच-दिवसांची प्रशिक्षण योजना, यांचा समावेश आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम राष्ट्रीय उत्पादकता समितीने आयोजित केला होता आणि पंपांच्या योजनेचे ऊर्जा लेखापरीक्षण चालू आहे. या पथदर्शक योजना राबविण्यासाठी भार व्यवस्थापन आकार म्हणून वसूल केलेल्या रकमेतून खर्च करण्यास आयोगाने बेस्टला मंजूरी दिली.

आरईएलच्या पथदर्शक योजनेत, ग्राहकाच्या विजेच्या मागणी व्यवस्थापनाची योजना तयार करणे, ३० ऊर्जा-लेखापरीक्षणे आयोजित करणे, विद्युत भार संशोधन आणि विजेच्या मागणी व्यवस्थापनाद्वारे ८व्या खार रोड विभागातील आरईएलच्या फीडरवरील बोलीद्वारे कार्यक्षम ऊर्जा मिळविणे, इ. बाबींचा समावेश आहे. भार व्यवस्थापन आकार म्हणून आरईएलने वसूल केलेल्या रकमेतून हा कार्यक्रम राबविण्यास आयोगाने मंजूरी दिली.

**ग्राहक वीज मागणी व्यवस्थापन-निविदांद्वारे बोली लावण्याची पध्दत**

ग्राहक वीज मागणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रात महाराष्ट्रातील वितरण परवानेधारकांना असलेला मर्यादित अनुभव लक्षात घेता, ऊर्जा व्यवस्थापनाबाबत सेवा देणाऱ्या कंपन्या (एनर्जी सर्व्हिस कंपनी), उपकरणांचे उत्पादक, वित्तीय संस्था, विजेचा वापर करणारे, अशासकीय संस्था यासारख्या-हा कार्यक्रम राबविणाऱ्या अन्य संस्थांना, कमी खर्चिक ऊर्जा बचतीच्या योजना विकसित करण्याकरिता आणि राबविण्याकरिता किंवा विजेच्या मागणीच्या व्यवस्थापनाच्या कार्यक्रमांकरिता पर्याय विकसित करण्यासाठी, प्रोत्साहन-अधिदान देणे इष्ट असल्याचे आयोगाला आढळून आले.

अशा संस्थांनी वीज मागणी व्यवस्थापनाचा कार्यक्रम राबविण्याकरिता त्यांना प्रोत्साहन देणे आणि तो सुलभ करण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे विजेच्या मागणीच्या व्यवस्थापनाची प्राप्ती-प्रकिया किंवा विजेच्या मागणीच्या व्यवस्थापन बोलीच्या प्रक्रिया स्थापन करणे, हा आहे. म्हणूनच, आता राज्यातील वितरण परवानाधारकांमध्ये विजेच्या मागणीच्या व्यवस्थापनाद्वारे बोलीची प्रक्रिया स्थापन करण्यासाठी एक पध्दत विकसित करण्याकरिता आयोगाने अभ्यास सुरु केला आहे. अशी प्रकिया एकदा सुरु झाली की, वितरण परवानाधारकांना विविध विभागांमध्ये विजेच्या मागणीच्या व्यवस्थापनाची किंवा ऊर्जा बचतीची सध्या असलेली सुप्त क्षमता तातडीने वापरात आणून त्याद्वारे विजेचा तुटवडा कमी करणे शक्य होईल, अशी आयोगाची अपेक्षा आहे.

ग्राहकाच्या विजेच्या मागणीच्या व्यवस्थापनाकरिता सर्वात कमी-खर्चिक पर्याय शोधण्यासाठी, राज्यातील सर्व वीज वितरण परवानाधारकांच्या निवडक फीडर्सचा (नागरी व ग्रामीण भागातील दोन्ही, जसे लागू असेल तसे) अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात प्रत्येक फीडरकरिता नमुना कराराचे प्रारुप, निवडक साधनांसाठी प्रारुप मानके तसेच बोलीचा पर्याय, या बाबींचा देखील समावेश होता.

बोलीचे प्रारुप दस्तऐवज आणि इतर अहवाल यांचे काळजीपूर्वक विश्लेषण करण्यात आले. या बाबतीत अनेक वेळा चर्चा आणि सुधारणा झाल्यानंतर - मुंबईतील खार येथील आरईएलचा फीडर आणि बेस्टचा कारमायकेल रस्ता येथील फीडर आणि नागपूर येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडचा फीडर, या तीन वेगवेगळ्या फीडर्सकरिता ग्राहकाच्या विजेच्या मागणीच्या व्यवस्थापनाकरिता तीन नमूना बोलीचे दस्तऐवज तयार करण्यात आले. या तीन बोली दस्तऐवजांचे परीक्षण संबंधित परवानेधारकांकडून करण्यात येत असून ते झाल्यानंतर परवानाधारक बोली मागवतील.

**बहु-वर्षीय वीज दराअंतर्गत (एमवायटी) ग्राहक वीज मागणी व्यवस्थापन आराखड्याचा विकास**

आयोगाने, आपल्या वीज दराच्या विनियमांना अनुसरुन, वितरण परवानेधारकांना त्यांच्या दीर्घ-कालीन वीज प्राप्त करुन घ्यावयाच्या आराखड्यात ग्राहकांच्या विजेच्या मागणी व्यवस्थापनेच्या बाबतीत केलेल्या उपाय-योजनांचा समावेश करण्याचे निर्देश, दिले. आयोगाने, वितरण परवानाधारकांना ग्राहक वीज मागणी व्यवस्थापन हे त्यांच्या कामकाजाचा एक अविभाज्य भाग म्हणून स्वीकारण्याचा निर्देश दिला आणि ग्राहक वीज मागणी व्यवस्थापनाची रचना, विकास आणि अंमलबजावणीचे काम हाती घेण्याचे निर्देश देखील वितरण परवानाधारकांना दिले.

वितरण परवानाधारकांना, ग्राहक वीज मागणी व्यवस्थापनाच्या पुढाकारामध्ये, तांत्रिक व आर्थिक मदत, सवलती आणि ग्राहकांनी वीज बचत करण्याचे उपाय आणि ऊर्जेची कार्यक्षमता वाढविण्याच्या उपाय व प्रथांमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांना प्रवृत्त करण्याकरिता मार्गदर्शन, यांचा समावेश करण्याचा सल्ला देण्यात आला. अर्थ-सहाय्य करणाऱ्या संस्था, कार्यक्षम-ऊर्जा-बचत व्यवस्थापन कंपन्या आणि कार्यक्षम उर्जेची उत्पादने, आदेशिका आणि साधने यांचे उत्पादक, यासारख्या अन्य घटकांनी ग्राहक वीज मागणी व्यवस्थापनाच्या पुढाकारात सहभागी होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आयोगाने वितरण परवानाधारकांना आग्रहपूर्वक सांगितले.

ग्राहक वीज मागणी व्यवस्थापनाच्या पुढाकाराचा होणारा परिणाम जाणून घेण्याकरिता विद्युत भाराचे संशोधन आणि विजेच्या वापराचे सतत संनियंत्रण करण्याचेही निर्देश, आयोगाने वितरण परवानाधारकांना दिले. ही माहिती मिळण्यासाठी विद्युत भाराचे पध्दतशीरपणे संशोधन करणे आवश्यक आहे. विद्युत भाराच्या संशोधनामुळे ग्राहकाची विद्युत भाराबाबतची संक्षिप्त रुपरेखा, सेवेवरील खर्च, फायदेशीरतेबाबतची आकडेवारी देखील मिळते. त्यामुळेच, आयोगाने सर्व वितरण परवानेधारकांना विद्युत भाराबाबतचे संशोधन पध्दतशीरपणे सुरु करण्याचे व ते नियमितपणे चालू ठेवण्याचे आणि विद्युत भार संशोधन हे त्यांच्या कामकाजाचा एक अविभाज्य भाग करण्याचे निर्देश दिले.

## ऊर्जा बचतीची मोहीम

ग्राहक-संवाद साधण्यासाठी मागील वर्षी आखलेल्या धोरणानुसार, मुंबईतील वीज ग्राहकांमध्ये ऊर्जा बचतीबाबतची जाणीव निर्माण करण्याच्या मोहीमेची अंमलबजावणी, ही चालू वर्षातील एक लक्षणीय घटना होती. या मोहीमेचे मुख्य उद्देश, मुंबईतील ग्राहकांना येणाऱ्या वीज टंचाईची जाणीव करुन देणे, भार नियमनाची तीव्रता कमी करण्यासाठी वितरण परवानाधारकाबरोबर सहकार्य करणे आणि विजेच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी व कमी करण्यासाठी ग्राहकांना प्रवृत्त करणे, हे होते.

बेस्ट, आरईएल आणि टाटा पॉवर कंपनी (टीपीसी) यांनी संयुक्तपणे आखलेली आणि कार्यान्वित केलेली ही मोहीम सुलभतेने राबविण्यात आयोगाने सहाय्यकारी भूमिका निभावली. या परवानेधारकांनी जून, २००६ मध्ये एका संयुक्त समन्वय समितीची स्थापना केली आणि 'आय विल, मुंबई विल' या मुख्य शीर्षकाला साजेल अशी परिणामकारक सृजनशील साधनसामग्री या मोहीमेकरिता तयार करुन देण्यासाठी त्यांनी एका व्यावसायिक एजन्सीची निवड केली.

या मोहीमेची उद्दिष्टे साध्य करण्याकरिता- बाह्य, वर्तमानपत्रे, रेडिओ व सिनेमा-आदी सर्व प्रसारमाध्यमे वापरण्यात आली. तसेच जागरुकता निर्मितीसाठी कार्यक्रमही हाती घेण्यात आले. या मोहीमेवर एकूण रुपये ४.८० कोटींचा खर्च झाला. हा खर्च वितरण कंपन्यांनी 'भार व्यवस्थापन आकार' (एलएमसी) म्हणून गोळा केलेल्या रकमेतून करण्यात आला.

**पथदर्शक प्रकल्पांचे सर्वंकष मूल्यांकन**

महावितरण कंपनीने मागील वर्षी नाशिक येथे आणि आरईएलने मुंबई येथे सीएफएल्स पुरविण्यासाठी राबविलेल्या दोन पथदर्शक प्रकल्पांचे मूल्यांकन स्वतंत्र संस्थांकडून करुन घेण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला आणि आरईएलला दिले. या सर्वंकष मूल्यांकनाचे- विशेषत: महावितरण कंपनीच्या प्रकल्पाचे- निर्देश देण्यामागे आयोगाचा मुख्य उद्देश, त्यातून

मिळालेला अनुभव आणि शिक्षणामुळे सीएफएल्स बल्बच्या विक्रीचा कार्यक्रम राज्य-स्तरावर राबविताना त्याची रचना व अंमलबजावणी अधिक चांगल्या रितीने करणे, हा होता.

या प्रकल्पामुळे विजेच्या वापरात किती युनिट्सची बचत झाली, विजेची किती मेगावॉट/किलोवॉट मागणी कमी झाली, आणि हा पथदर्शक प्रकल्प राबविताना वापरलेल्या विविध कार्यपध्दती कितपत प्रभावी व उपयुक्त होत्या, याबाबत, हे मूल्यांकन करण्यात आले. या मूल्यांकनाच्या निष्कर्षांच्या आणि आयोगाने दिलेल्या सल्ल्याच्या आधारे, महावितरण कंपनीने सीएफएल्सचा वापर वाढविण्यासाठी राज्यातील चार जिल्ह्यात (पुणे, नागपूर, औरंगाबाद व कोल्हापूर) या प्रकल्पाची रचना व अंमलबजावणी बाह्य संस्थेमार्फत करुन घेण्याचे योजिले आहे.

## नियोजित भार नियमनात वाढ करण्याचा महावितरण कंपनीचा प्रस्ताव

महावितरण कंपनीने आयोगास कळविले की, त्यांच्या परवान्याच्या क्षेत्रात विजेच्या मागणी व पुरवठ्यातील तफावत ५३००-५५०० मेगावॉट इतकी वाढली असल्याने त्यांना नियोजित भार नियमनाशिवाय, सकाळी ६.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत संकटकालीन भार नियमन करणे भाग पडत आहे. जनतेचा या बाबतीतला रोष कमी करण्यासाठी, महावितरण कंपनीने, आणीबाणीचा तात्पुरता उपाय म्हणून, नियोजित भार नियमनात वाढ करण्याचे प्रस्तावित केले आणि औद्योगिक व एमआयडीसी क्षेत्रात सध्याच्या एक दिवसाशिवाय आणखी एक सक्तीची सुट्टी लागू करण्यासाठी आयोगाकडे मान्यता मागितली.

आयोगाने पुणे येथे दिनांक १५ फेब्रुवारी, २००७ रोजी जाहीर सुनावणी घेतली आणि त्यानंतर आयोगाचे कोणतेही निर्देश नसताना, आणखी एक सक्तीची सुट्टी लागू करावयाचा प्रस्ताव महावितरण कंपनीने स्वतःहून मागे घेतला.

आयोगाने दिनांक २० फेब्रुवारी, २००७ च्या आदेशात नमूद केले की, महावितरण कंपनीने सादरीकरणात प्रस्तावित केल्यापेक्षा अधिक भार नियमन करण्याची आवश्यकता राहील. उद्योगांकडील स्व-वापरासाठीच्या विद्युत निर्मिती प्रकल्पांकडे असलेली शिल्लक क्षमता आणि वितरण फ्रॅन्चायसीमार्फत, स्थानिक वीज निर्मितीची शक्यता, विशेषत: नागरी व औद्योगिक वस्त्यांमध्ये, अजमावून बघण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला दिले.

प्रत्येक फीडरवर लागू असलेले भार नियमनाचे वेळापत्रक प्रत्येक उप-केंद्रात ठळकपणे लावण्याचे व त्यास स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्दी देण्याचे निर्देश महावितरण कंपनीला देण्यात आले. शेतीसाठीचे फीडर अलग करण्याचा कार्यक्रम तातडीने हाती घेण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला दिले. जर ही योजना राबविली गेली तसेच महावितरण कंपनीने प्रस्तावित केल्याप्रमाणे अधिक वीज पुरवठा उपलब्ध झाला तर भार नियमनाचा कालावधी आणखी कमी करता येईल. आयोगाने, महावितरण कंपनीला आणखी असेही निर्देश दिले की, भार नियमनाची आवश्यकता कमी होईल तेव्हा शेती-प्रभावित क्षेत्राला प्रथम, त्यानंतर इतर क्षेत्रांना व शेवटी औद्योगिक वस्त्या व शहरांना दिलासा देण्यात यावा.

## वीज दरासंबंधीचे प्रश्न

अहवाल वर्षात, आयोगाने, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण कंपनी), मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट), टाटा पॉवर कंपनी (टीपीसी)-वितरण विभाग, रिलायन्स एनर्जी लिमिटेड (आरईएल)-वितरण विभाग, आणि मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी या पाच वितरण परवानेधारकांच्या तसेच राज्य पारेषण कंपनी म्हणजेच महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. (महापारेषण कंपनी) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. (महानिर्मिती कंपनी) यांच्या आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वार्षिक महसुलाच्या गरजेचा आणि वीज दराचा आढावा घेऊन त्यास मंजूरी दिली.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती ) विनियम, २००५ मधील तरतुदींनुसार आयोगाने महानिर्मिती कंपनीची आणि वितरण परवानेधारकांची वार्षिक महसूलाची गरज मंजूर केली असून विनियमांनुसार नसलेल्या बाबींकरिता कारणे नमूद केली.

दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांकरिता नवीन वर्गवारी निर्माण करुन सवलतीच्या दराने वीज पुरवठा करावा, असे राष्ट्रीय विद्युत धोरणात नमूद करण्यात आले आहे. या धोरणानुसार सर्व परवानेधारकांना दरमहा ३० युनिट्सपेक्षा कमी वीज वापर करणा-या ग्राहकांकरिता नवीन उप-वर्गवारी 'दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल)'- निर्माण करावी, असा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. या उप-वर्गवारीकरिता आयोगाने 'टु पार्ट टॅरिफ' देखील लागू केला आहे.

आयोगाने, वीज बचतीच्या महत्त्वाची जाणीव व्हावी यासाठी, विजेचा जास्त वापर करणाऱ्या जाहिरात आणि जाहिरात फलक, शॉपिंग मॉल्स इ. साठी, एक नवीन वर्गवारीदेखील सुरु करुन त्या वर्गवारीकरिता जास्तीचे वीज दर लागू केले आहेत.

विद्युत निर्मिती कंपन्यांनी कमाल मागणीच्या काळात जल-विद्युत निर्मिती वाढवावी आणि किमान गरजेच्या काळात जल स्रोतांचा वापर कमी करावा, यासाठी आयोगाने जल-विद्युत उत्पादनाकरिता कमाल व किमान मागणीच्या कालावधीसाठी वेगवेगळ्या विद्युत दरांची रचना देखील केली.

### महावितरण कंपनीची आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दराची याचिका

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची (मराविमं)ची पुनर्रचना झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडची (महावितरण कंपनी) वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दर निश्चित करण्यासाठी ही पहिलीच याचिका होती. जाहीर सुनावणीची प्रक्रिया झाल्यानंतर, आयोगाने दिनांक २० ऑक्टोबर, २००६ च्या आदेशान्वये, महावितरण कंपनीची वार्षिक महसुलाची गरज आणि त्यांच्या परवाना क्षेत्रातील ग्राहकांकरिता, दिनांक ०१ ऑक्टोबर, २००६ ते ३१ मार्च, २००७ या कालावधीकरिता लागू होणारा वीज दर निश्चित केला. हा कालावधी पुढे ३० एप्रिल, २००७ पर्यंत वाढविण्यात आला. या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

(ए) शेतीकरिता वीज वापराचा अंदाज करताना फक्त ग्राहकांकडील मीटर्सवर विसंबून राहण्याचे आयोगाने ठरविले आणि असे निर्देश दिले की यापुढे फक्त ग्राहकांकडील नोंद झालेला विजेचा वापर-किंवा डीटीसी मीटरींग पूर्ण झालेल्या मीटर्सवरील माहिती-शेतीसाठीच्या वीज वापराचे अंदाज करण्यासाठी आधारभूत धरण्यात येईल.

(बी) आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये महावितरण कंपनीला वितरण हानि २ टक्क्यांनी कमी करण्याचे निर्देश देण्यात आले. वितरण हानि कमी करण्यासाठी, कर्मचारी प्रोत्साहन योजना सुरु करुन, कर्मचाऱ्यांना त्यांच्या भागातील तोट्यांकरिता जबाबदार धरण्याचेही, निर्देश देण्यात आले.

(सी) आयोगाने दिनांक ०१ ऑक्टोबर, २००६ पासून नियामक दायित्व आकार (आर एल सी) रद्द केला.

(डी) आयोगाने, कमी दाब वाणिज्यिक वर्गवारीच्या अंतर्गत, जाहिरात आणि जाहिरात फलक-अशी नवीन उप-वर्गवारी सुरु केली. अशा ग्राहकांना डिझेल-सेट्सवरील वीज घेण्याचा पर्याय आर्थिकदृष्ट्या अधिक किफायतशीर ठरेल अशा रितीने विजेचे दर आयोगाने निश्चित केले.

(इ) आयोगाने खर्चिक आणि अ-खर्चिक स्रोतांपासून मिळणाऱ्या विजेचा वेगळा विचार केला. ग्राहकांची वर्गवारी किंवा तो कोणत्या भागातील आहे हे लक्षात न घेता, अ-खर्चिक विजेचे वाटप सम-प्रमाणात करण्यात आले. यामुळे सर्व भागांमध्ये दर दिवशी नऊ तासांचे भार-नियमन करावे लागले असते. तथापि, शेती-प्रभावित भागांमध्ये १२ तासांचे भार-नियमन असल्यामुळे, इतर भागांकरिता प्रत्यक्षात भार-नियमन ७.२५ तासांपर्यंत कमी झाले. इतर भागातील ग्राहकांना खर्चिक स्रोतापासूनच्या विजेचा अतिरिक्त पुरवठा होत असल्यामुळे त्यांचे भार-नियमन कमी झाले. या ग्राहकांना भार-नियमनापासून ज्या प्रमाणात दिलासा मिळाला असेल त्या प्रमाणात त्यांना अतिरिक्त पुरवठा आकार (ए एस सी) द्यावा लागेल अशा रितीने आयोगाने अतिरिक्त पुरवठा आकार निश्चित केले.

(एफ) दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) ग्राहकांना अतिरिक्त पुरवठा आकार माफ करण्यात आला. दर महा ३०० युनिट्सपेक्षा कमी विजेचा वापर करणाऱ्या निवासी ग्राहकांना फक्त १० टक्के अतिरिक्त पुरवठा आकार लावण्यात आला.

**महानिर्मिती कंपनीची आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दराची याचिका**

आयोगाने दिनांक ०७ सप्टेंबर, २००६ च्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लिमिटेडची (महानिर्मिती कंपनी) दिनांक ०१ सप्टेंबर, २००६ ते ३१ मार्च, २००७ करिता वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दर निश्चित केले.

आयोगाच्या आदेशात खालील ठळक बाबींचा समावेश होता-

(ए) विद्युत निर्मिती केंद्रांच्या तेरीज पत्रकावर आधारभूत आर्थिक वर्ष २००६-०७ करिता केंद्र-निहाय 'टु पार्ट टॅरिफ'. जेथे तेरीज पत्रकाचा तपशील उपलब्ध नव्हता तेथे विद्युत निर्मिती कंपन्यांच्या नक्त स्थिर मत्तांच्या प्रमाणात स्थिर खर्च ठरविण्यात आला.

(बी) जल-विद्युत निर्मिती केंद्रांकरिता कमाल मागणी असलेल्या आणि कमाल मागणी नसलेल्या कालावधीकरिता वेगवेगळे वीज दर. महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक वीज निर्मिती केंद्रांच्या उच्चतम अस्थिर खर्चाच्या आधारे कमाल मागणी नसलेल्या कालावधीकरिता वीज दर ठरवून तो प्रति युनिट रु. १.६५ इतका निश्चित करण्यात आला. कमाल मागणीच्या कालावधीकरिता प्रति युनिट रु. २.०० इतका वीज दर निश्चित करण्यात आला आणि तो कमाल मागणी नसलेल्या कालावधीतील वीज दरापेक्षा २० टक्के जास्त आहे.

महानिर्मिती कंपनीने सादर केलेल्या अंदाजित खर्चाच्या आधारे, नवीन पारस आणि नवीन परळी केंद्रांकरिता देखील तात्पुरते वीज दर आयोगाने मंजूर केले.

**महापारेषण कंपनीची आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दराची याचिका**

आयोगाने दिनांक २८ जून, २००६ च्या आदेशाने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीची (महापारेषण कंपनी) ३१ मार्च, २००७ पर्यंतची वार्षिक महसुलाची गरज आणि वीज पारेषण दर निश्चित केले. या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

(ए) महापारेषण कंपनीच्या पारेषण जाळ्यासाठी आर्थिक वर्ष २००६-०७ करिता ४.८५ टक्के इतकी पारेषण हानि ठरवून देण्यात आली.

(बी) मागील वर्षातील कर्मचाऱ्यांवरील खर्चाला पाच-वर्षाच्या कालावधीकरिता चक्रवाढ दराने वार्षिक वृध्दी दर (सीएजीआर) लावून, आयोगाने आर्थिक वर्ष २००६-०७ करिता कर्मचाऱ्यांवरील खर्च, अंदाजित केला. त्यावर महागाई भत्ता व वार्षिक वेतन-वाढीमुळे होणाऱ्या वाढीव खर्चास मंजूरी दिली.

(सी) आर्थिक वर्ष २००६-०७ करिता प्रशासकीय आणि सर्वसाधारण खर्चाचा (ए आणि जी) अंदाज करताना, आयोगाने मागील वर्षाच्या खर्चात दर वर्षीप्रमाणे ४.२१ टक्के वाढ विचारात घेतली.

(डी) मागील कल लक्षात घेऊन दुरुस्ती व देखभालीवरील खर्च मंजूर करण्यात आला आणि जर दुरुस्ती व देखभालीवरील सविस्तर आराखडा आयोगाने मंजूर केला असेल तर दुरुस्ती व देखभालीवरील अतिरिक्त खर्च एक-वेळचा खर्च म्हणून मागणी करण्यास महापारेषण कंपनीला अनुमती देण्यात आली.

(इ) मागील दोन वर्षातील स्थिर मत्ता भांडवलीकरणाची सरासरी ही आर्थिक वर्ष २००६-०७ करिता अनुज्ञेय भांडवली खर्च म्हणून विचारात घेतली.

**बेस्टची आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दराची याचिका**

बेस्टची आर्थिक वर्ष २००४-०५ आणि २००५-०६ करिता वार्षिक महसुलाची गरज आणि बेस्टच्या ग्राहकांकरिता विजेचे दर निश्चित करण्याच्या आयोगाने पारित केलेल्या संक्षिप्त आणि सविस्तर आदेशाला नवी दिल्ली येथील विद्युत अपील न्यायाधिकरणापुढे बेस्ट उपक्रमाने आव्हान दिले होते. विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिनांक १८ ऑगस्ट, २००६चा निकाल आणि त्याअंतर्गत दिलेल्या निर्देशांमुळे, बेस्टची आर्थिक वर्ष २००४-०५ आणि २००५-०६ करिता वार्षिक महसुलाची गरज व आर्थिक वर्ष २००५-०६ चा वीज दर यामध्ये बदल झाला व आयोगाच्या दिनांक २६ सप्टेंबर, २००६ च्या पुरवणी आदेशान्वये त्यांची फेर-निश्चिती करण्यात आली.

त्यानंतर, आयोगाच्या सदर पुरवणी आदेशाचे पुनर्विलोकन करण्याची मागणी बेस्टने एका याचिकेद्वारे केली आणि आयोगाने दिनांक ०८ नोव्हेंबर, २००६ च्या आदेशाने ती याचिका निकालात काढली.

वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दर यांची सांगड आयोगाने घालू नये, अशी विनंती बेस्टने आयोगास केली होती. आयोगाने बेस्टला स्पष्टपणे कळविले की, वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दराचे निश्चितीकरण यांची सांगड घालण्याची जरूरी आहे. तसेच, विद्युत अधिनियम, २००३च्या कलम ६१ (एफ) नुसार बहु-वर्षीय वीज दराच्या तत्त्वांनुसार वीज दर ठरविणे आणि वीज दर ठरविण्यासाठी अटी व शर्ती विनिर्दिष्ट करणे, आयोगास अनिवार्य होते.

बहु-वर्षीय वीज दराची चौकट दिनांक ०१ एप्रिल, २००७ पासून महाराष्ट्रातील बेस्ट आणि वीज निर्मिती कंपन्यांसह सर्व परवानेधारकांना

लागू करावयाची होती. त्यामुळे आयोगाने असा निर्णय दिला की, बेस्टची आर्थिक वर्ष २००६-०७ ची वार्षिक महसुलाची गरज आयोग निश्चित करेल. तसेच काळजीपूर्वक तपासणीनंतर, वार्षिक महसुलाच्या गरजेमध्ये आढळलेले कोणतेही आधिक्य/तूट, त्याचप्रमाणे फेब्रुवारी आणि मार्च, २००७ या दोन महिन्यांच्या चालू खर्चास ६ टक्के व्याज दराने, आर्थिक वर्ष २००६-०७ च्या अचूक समायोजनेच्या वेळी आयोग परवानगी देईल.

बेस्टच्या उपरोक्त अर्जाच्या संबंधात, आयोगाने दिनांक १८ जानेवारी, २००७ रोजी दिलेल्या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

(ए) परवानाप्राप्त व्यवसाय आणि इतर व्यवसाय यांच्यामधील संयुक्त आणि सामायिक खर्चाचे रास्त आणि पारदर्शक खर्च-वाटप विवरणपत्र बेस्टने स्वीकारावे आणि लेख्यांमध्ये ते वेगवेगळे दर्शवावेत, असे मत आयोगाने व्यक्त केले.

(बी) बेस्टच्या बस डेपोमधील विद्युत पुरवठा विभागाने वापरलेल्या जागेसाठी भाडे देणे गरजेचे असल्याचे बेस्टचे म्हणणे आयोगाने मान्य केले नाही; कारण हे दोनही विभाग (परिवहन आणि विद्युत पुरवठा) हे मुंबई महानगरपालिका या एकाच कायदेशीर संस्थेचे भाग आहेत. तथापि, आयोगाने असे निर्देश दिले की, परिवहन/विद्युत पुरवठा विभागाने जागा जेवढी वापरली असेल/ ताब्यात ठेवली असेल, तेवढ्या जागेच्या देखभालीवर बेस्टने केलेल्या खर्चाची योग्य विभागणी बेस्टच्या अनुक्रमे परिवहन विभाग आणि विद्युत पुरवठा विभाग यांच्यामध्ये केली जावी.

(सी) आर्थिक वर्ष २००५-०६ आणि २००६-०७ मधील अनुक्रमे १२.४ टक्के आणि ११.५ टक्के वितरण हानि आयोगाने विचारात घेतली.

**टाटा पॉवर कंपनी (टीपीसी) ची आर्थिक वर्ष २००५-०६ करिता वार्षिक महसुलाची गरज आणि २००६-०७ करिता वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दराची याचिका**

टीपीसीच्या याचिकेवरील दिनांक ०३ ऑक्टोबर, २००६ च्या आयोगाच्या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -

(ए) आयोगाने टीपीसीच्या विद्युत निर्मिती, पारेषण आणि वितरण, या प्रत्येक विभागासाठी वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दर आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वेगवेगळे मंजूर केले.

(बी) आयोगाने असे मत व्यक्त केले की, संपूर्ण राज्यासाठी लागू असलेली मेरिट ऑर्डर डिस्पॅच बाबतची तत्त्वे विचारात घेऊन महागडी वीज वितरित करण्यात यावी. विद्युत केंद्र क्रमांक ४ ची विद्युत निर्मिती क्षमता वगळल्यानंतर, उपलब्धतेपेक्षा वीज मागणी जास्त होईल त्यावेळी मागणी असेल त्याप्रमाणे, वर्षातील केवळ विशिष्ट महिन्यातील मागणी पुरी करण्यासाठी, विद्युत केंद्र ४ मधील वीज निर्मिती आयोगाकडून विचारात घेण्यात येईल.

(सी) टीपीसी-विद्युत निर्मिती विभाग आणि वितरण परवानेधारकांमध्ये वीज खरेदी करार अस्तित्वात नाहीत आणि विद्युत निर्मिती क्षमतेचे वाटपही झालेले नाही. ही बाब विचारात घेऊन, आर्थिक वर्ष २००५-०६ मध्ये तीन वितरण परवानेधारकांची, परवानेधारकनिहाय सरासरी शिखर मागणी ज्या प्रमाणात टीपीसीने पूर्ण केली त्या प्रमाणात, टीपीसी-विद्युत निर्मिती विभागाचा वार्षिक स्थिर खर्च वसूल करण्यास आयोगाने अंतरिम उपाय-योजना म्हणून मान्यता दिली.

(डी) टीपीसी-वितरण विभागाला पारेषण-वितरण इंटरफेसच्या ठिकाणी आवश्यक असलेल्या विजेचा अंदाज करण्यासाठी २.९३ टक्के वितरण हानि आयोगाने विचारात घेतली.

(इ) प्रति व्होल्टेजची क्षमता पातळी आणि व्होल्टेज-निहाय ॲसेट-बेस यावर आधारित प्रति व्होल्टेज वहन आकार आयोगाने निश्चित केले. टीपीसीच्या निवेदनावर आधारित, वहन आणि किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसाय यांची वार्षिक महसुलाची गरज वेगवेगळी करण्यात आली. आयोगाने असा निर्णय दिला की, थेट पारेषण जाळ्याशी जोडलेल्या ग्राहकांना वहन आकार भरावा लागणार नाही.

**रिलायन्स एनर्जी लिमिटेडची (आरईएल) आर्थिक वर्ष २००५-०६ करिता वार्षिक महसुलाची गरज आणि आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दराची याचिका**

आरईएलच्या याचिकेवरील दिनांक ०३ ऑक्टोबर, २००६ च्या आयोगाच्या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये-

(ए) आयोगाने आर्थिक वर्ष २००६-०७ करिता आरईएलच्या विद्युत निर्मिती, पारेषण आणि वितरण, या प्रत्येक विभागासाठी वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दर वेगवेगळे मंजूर केले.

(बी) कंपनीची मागील कामगिरी लक्षात घेऊन व त्याचवेळी कंपनीच्या कामकाजातील कार्यक्षमता राखण्यासाठी उत्तेजन देण्याकरिता काही प्रोत्साहने कायम ठेवून, आरईएलची कामकाजविषयक सुधारित प्रमाणके आयोगाने विचारात घेतली. नियंत्रणाधीन घटकांच्या कामगिरीतील सुधारणेमुळे झालेले फायदे ग्राहक आणि विद्युत कंपनी यांच्यात वाटून घेण्याची पध्दत आयोगाने तपशीलवार ठरवून दिली.

(सी) आर्थिक वर्ष २००५-०६ आणि २००६-०७ करिता अनुक्रमे १२.०० टक्के आणि ११.५२ टक्के वितरण हानि आयोगाने विचारात घेतली.

(डी) आरईएलने निवडक ग्राहकांना दिलेल्या रिबेट्सच्या संदर्भात विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशानुसार आयोगाकडून, ग्राहकांच्या सर्व वर्गवारींना (बीपीएल वर्गवारी वगळून) दिनांक ०१ ऑक्टोबर, २००६ ते ३१ मार्च, २००७ च्या फक्त ६ महिन्यांच्या कालावधीकरिता अतिरिक्त ऊर्जा आकार म्हणून ९७ पैसे प्रति युनिट लावण्याचे ठरविण्यात आले.

(इ) विद्युत कंपन्यांमध्ये परस्परात झालेल्या राज्यातील विजेच्या देवाण-घेवाणीकरिता, करारानुसार प्राप्त केलेल्या विजेच्या व्यतिरिक्त , लागू होणारा दर हा वीज पुरवठा करणाऱ्या विद्युत कंपनीच्या सीमांतिक (मार्जिनल) खर्चा इतका राहील. सदर दर विद्युत कंपन्यांमध्ये झालेल्या नक्त विद्युत पुरवठ्यास लागू राहील.

(एफ्) संध्याकाळच्या कमाल मागणीच्या कालावधीत-म्हणजेच संध्याकाळी ६.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत-वीज वापरास प्रोत्साहन मिळू नये याकरिता, उच्च-दाब औद्योगिक, वाणिज्यिक आणि लघु-दाब ग्राहकांना, दिवसाच्या वेळेनुसार (टीओडी) वीज दर लागू करण्यास आयोगाने सुरुवात केली.

(जी) प्रति व्होल्टेजची क्षमता पातळी आणि व्होल्टेज-निहाय ॲसेट-बेस यावर आधारित प्रति व्होल्टेज वहन आकार आयोगाने निश्चित केले.

### मुळा-प्रवरा विद्युत सहकारी सोसायटीची आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वीज दर निश्चितीकरणाची याचिका

मुळा-प्रवरा विद्युत सहकारी सोसायटीची वार्षिक महसुलाची गरज आणि सोसायटीच्या ग्राहकांना दिनांक ०१ मार्च, २००७ पासून लागू होणारा वीज दर आयोगाने दिनांक २३ फेब्रुवारी, २००७ च्या आदेशान्वये निश्चित केला. मुळा-प्रवरा विद्युत सहकारी सोसायटीच्या कामकाजात सुधारणा व्हावी म्हणून आयोगाने सोसायटीला खालीलप्रमाणे निर्देश दिले-

(ए) वितरण हानि कमी करण्याचे लक्ष्य ठेवून, कर्मचाऱ्यांना त्यांच्या भागातील वीज वितरण हानीकरिता जबाबदार धरुन, कर्मचारी प्रोत्साहन योजना सुरु करावी.

(बी) १०० टक्के मीटर्स बसविण्याचे काम टप्प्या-टप्प्याने हाती घ्यावे, तसेच नवीन जोडण्या फक्त मीटर्स बसविल्यास द्याव्यात, या उपाय-योजना, ग्राहकांना केलेल्या विजेच्या विक्रीचा अंदाज करण्याऐवजी, विजेची आवक आणि विजेची विक्री यांच्या नोंदी परिणामकारक रितीने ठेवून त्याद्वारे वितरण हानि अचूकपणे ठरविण्याकरिता, सूचविण्यात आल्या.

(सी) जादा विद्युत भार, तांत्रिक तोटे, रोहित्र बंद पडण्याची वारंवारिता आणि विद्युत पुरवठ्यातील बिघाड कमी करण्यासाठी विद्युत वितरण यंत्रणा मजबूत करावी.

(डी) संस्थात्मक रचना, मुख्य कार्यप्रणाली, कार्यप्रक्रिया, कार्यपध्दती, यांच्या बाबतीत संस्थेचे मजबूतीकरण करणे आणि खर्च कमी करणे व महसूल वाढविणे शक्य व्हावे याकरिता कर्मचारी कामगिरी प्रोत्साहन योजना सुरु करावी.

(इ) मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटीचा महसूल वाढण्याच्या दृष्टीने सोसायटीच्या शेती, औद्योगिक, वाणिज्यिक आणि निवासी ग्राहकांच्या विद्युत भाराचे सर्व समावेशक सर्वेक्षण पूर्ण करुन प्रत्यक्षातील जोड भार समजण्यासाठी मंजूर विद्युत भार पुनः कळविणे.

(एफ्) सबसिडीच्या रकमेचा अंदाज करणे शक्य व्हावे, तसेच पुरवठा केलेल्या विजेची परिणामकारक किंमत ठरविता यावी म्हणून, व्होल्टेज-पातळी निहाय आणि ग्राहक वर्गवारी-निहाय हानि आणि पुरवठा केलेल्या विजेचा खर्च निश्चित करावा.

(जी) कृषी पंपांची कार्यक्षमता वाढविण्याच्या उपाय-योजनांसह वीज मागणी व्यवस्थापनाचे कार्यक्रम हाती घ्यावेत.

परवानेधारकाचा वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च भरुन निघेल असा वीज दर ठरविणे तसेच सोसायटीच्या ग्राहक वर्गवारी व वीज दराची रचना ही महावितरण कंपनीच्या ग्राहक वर्गवारी व वीज दर रचना यासारखी ठेवणे, ही तत्त्वे आयोगाने वीज दर ठरविताना स्वीकारली आहेत.

## बहु-वर्षीय वीज दराचे आदेश

बहु-वर्षीय वीज दराची चौकट ही परवानेधारकांसमोर किमान अपेक्षित कामगिरीचा आराखडा ठेवते. त्यामुळे विजेचे वार्षिक दर निश्चित करण्याचे काम सोपे होते. तथापि, बहु-वर्षीय वीज दराची पध्दत सुरु करण्यासाठी विश्वसनीय आकडेवारी, भक्कम तयारी आणि सातत्याने माहितीचा पुरवठा होणे आवश्यक असते. बहु-वर्षीय वीज दराची चौकट आयोगाने एप्रिल, २००७ पासून महाराष्ट्रात लागू केली आहे. त्यानुसार आयोगाने बहु-वर्षीय वीज दर (एमवायटी) निश्चित करण्याबाबतचे आदेश पारित केले आहेत. आयोगाने असे आदेश दिले आहेत की, आर्थिक वर्ष २००७-०८ च्या शेवटच्या तिमाहीत परवानेधारकांच्या कामगिरीचा आढावा घेण्यात येईल आणि त्यासाठी परवानेधारकाने त्याची वार्षिक कामगिरीच्या आढाव्याची याचिका, कामगिरीतील तफावतीबाबतच्या सविस्तर कारणमीमांसेसह, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या ३० नोव्हेंबर पूर्वी, आयोगास सादर करावी.

वीज खरेदीचा सीमांतिक खर्च जास्त असल्यामुळे, वीज दराबाबतच्या धोरणातील मार्गदर्शक सूचनांनुसार, सर्व वितरण परवानेधारकांकरिता क्रॉस-सबसिडी अधिभार, शून्य ठरविण्यात आला.

### महापारेषण कंपनीकरिता बहु-वर्षीय वीज दराचा आदेश

महापारेषण कंपनीच्या बाबतीत आयोगाने आर्थिक वर्ष २००५-०६ करिता प्रत्यक्ष महसूल व खर्चाची छाननी करुन अचूक समायोजन केले, नियंत्रण कालावधीकरिता कामगिरीची मार्गदर्शिका ठरवून दिली आणि नियंत्रणाखाली असलेला व नियंत्रणाखाली नसलेला असे खर्चाचे वर्गीकरण केले. आदेशातील ठळक बाबी खालीलप्रमाणे-

(ए) महापारेषण कंपनीच्या बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीत, पारेषण हानि आणि पारेषण यंत्रणेची उपलब्धता या संबंधी कामगिरीची मार्गदर्शिका, आयोगाने समाविष्ट केली. पारेषण परवानाधारकांच्या कामगिरीच्या संदर्भात या दोन्ही बाबी सर्वात महत्त्वाच्या निदर्शक आहेत.

(बी) नियंत्रण कालावधीकरिता पारेषण हानीची मार्गदर्शिका ४.८५ टक्के कायम ठेवण्याचा महावितरण कंपनीचा प्रस्ताव आयोगाने स्वीकारला. मात्र, एकदा महापारेषण कंपनीने उपलब्धतेवर आधारित वीज दरासाठी मीटर्स सर्व इंटरफेसच्या ठिकाणी बसविल्यावर आणि बसविलेल्या मीटर्सबाबतची माहिती आयोगास सादर केल्यावर, पारेषण हानीच्या पातळीचा आढावा आयोगाकडून घेतला जाईल.

(सी) पारेषण यंत्रणा उपलब्धतेचे निकष आयोगाच्या वीज दराच्या विनियमांनुसार असल्यामुळे, आयोगाने ते स्वीकारले.

### बेस्टकरिता बहु-वर्षीय वीज दराचा आदेश

मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट उपक्रमाने, आर्थिक वर्ष २००७-१० करिता वार्षिक महसुलाची गरज आणि २००७-०८ करिता वीज दर निश्चितीकरणाची याचिका दिनांक ११ डिसेंबर, २००६ रोजी मान्यतेसाठी आयोगास सादर केली. याबाबत दिनांक २७ फेब्रुवारी, २००७ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली आणि आयोगाने दिनांक ३ एप्रिल, २००७ च्या आदेशाद्वारे आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० करिता बेस्ट उपक्रमाची वार्षिक महसुलाची गरज आणि बेस्टच्या ग्राहकांकरिता दिनांक १ एप्रिल, २००७ ते ३१ मार्च, २००८ या कालावधीकरिता वीज दर निश्चित केले.

आयोगाने या आदेशाद्वारे-

(ए) आर्थिक वर्ष २००६-०७ मधील महसुलाची तूट आर्थिक वर्ष २००७-०८ मध्ये वसूल करण्यास मान्यता दिली आणि नियंत्रण कालावधीमध्ये प्रत्येक वर्षी वितरण तोटे ०.५ टक्क्याने कमी करण्याचे निर्देश बेस्टला दिले.

(बी) महागड्या वीज खरेदीवर झालेला खर्च आणि खात्रीच्या व अखंडित वीज पुरवठा करण्याकरिता स्टॅन्ड-बाय आकारांपोटीचा खर्च वसूल करण्याकरिता, ग्राहकांच्या विशिष्ट वर्गवारींसाठी नवीन रिलायेबिलिटी आकार सुरु करण्यात आला.

(सी) रिॲक्टिव्ह पॉवर चार्जेस ऐवजी पॉवर फॅक्टर (पीएफ) दंड/प्रोत्साहन आकार लागू केले.

(डी) कमाल मागणीच्या कालावधीत विजेच्या वापरास उत्तेजन मिळू नये म्हणून दिवसाच्या वेळेनुसार (टीओडी) वीज दराची आकारणी काही उच्च-दाब ग्राहकांच्या वर्गवारीकरिता सुरु केली.

(इ) वीज बचतीची जाणीव व्हावी म्हणून, शॉपिंग मॉल्स, खेळाचे स्टेडियम्स आणि जाहिरात फलकावरील प्रकाशझोत, यासारख्या विजेचा भरमसाठ वापर करणाऱ्या ग्राहकांच्या वर्गवारींसाठीच्या वीज दरात वाढ केली.

(एफ) ज्या उद्देशांसाठी- जसे निवासी, वाणिज्य आणि औद्योगिक- वीज पुरवठा घेण्यात येतो, त्या उद्देशांच्या आधारे ग्राहकांचे वर्गीकरण, विनिर्दिष्ट केलेल्या वीज दराच्या सुधारित वर्गवारींमध्ये करण्याचे निर्देश बेस्टला दिले. ज्या उद्देशांसाठी वीज पुरवठा घेण्यात येतो त्या उद्देशांच्या आधारे बेस्टच्या ग्राहकांचे वर्गीकरण न करता ते, विजेच्या वापराच्या किंवा मागील करारांच्या आधारे करण्यात येत असून ते क्लिष्ट आणि गोंधळ निर्माण करणारे असल्यामुळे, वरीलप्रमाणे निर्देश बेस्टला देण्यात आले.

**टीपीसी-विद्युत निर्मिती व्यवसायाकरिता बहु-वर्षीय वीज दराचा आदेश**

आयोगाने दिनांक ०२ एप्रिल, २००७ च्या आदेशाद्वारे टीपीसी-विद्युत निर्मिती_व्यवसायाच्या नियंत्रण कालावधीकरिता वार्षिक महसुलाची गरज आणि आर्थिक वर्ष २००७-०८ करिता, दिनांक ०१ एप्रिल, २००७ पासून लागू होणारा वीज दर निश्चित केला. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये-

(ए) टीपीसी-विद्युत निर्मिती व्यवसाय आणि वितरण परवानेधारकांमध्ये मान्यताप्राप्त वीज खरेदी करार अस्तित्वात नाहीत. त्यामुळे नियंत्रण कालावधीतील पहिल्या वर्षाकरिता, एकाच वेळी आलेल्या शिखर मागणीच्या प्रमाणात, टीपीसी-विद्युत निर्मिती विभागाच्या एकूण क्षमतेपैकी बेस्ट, टीपीसी-विद्युत वितरण विभाग आणि आरईएल-विद्युत वितरण विभाग, या तीन परवानाधारकांची वीज खरेदी आयोगाने विचारात घेतली. टीपीसी-विद्युत निर्मिती विभागाकडून तीन वितरण परवानाधारकांना मान्यताप्राप्त वीज खरेदी करारानुसार क्षमतेचे वाटप करण्याचा विचार आर्थिक वर्ष २००८-०९ पासून आयोग करेल.

(बी) कमी किंमतीने कोळसा प्राप्त करुन घेण्यासाठी विविध उपाय-योजनांबाबत अभ्यास करुन त्यासंबंधी अहवाल सादर करण्याचे निर्देश आयोगाने टीपीसीला दिले.

(सी) तेलावर आधारित विद्युत निर्मिती केंद्राकडून कमी वीज निर्मिती करण्याचे महत्त्व आयोगाने अधोरेखीत केले आणि टीपीसीला कमी किंमतीची वीज प्रथम खरेदी करणे, या तत्त्वाचे पालन करण्याचे निर्देश दिले.

**टीपीसी- पारेषण व्यवसायाचा बहु-वर्षीय वीज दराचा आदेश**

टीपीसीच्या बाबतीत, आयोगाने दिनांक ०२ एप्रिल, २००७ च्या आदेशाद्वारे नियंत्रण कालावधीकरिता टीपीसी- पारेषण व्यवसायाची वार्षिक महसुलाची गरज आणि दिनांक ०१ एप्रिल, २००७ ते ३१ मार्च, २००८ पर्यंत लागू होणारा, वीज दर निश्चित केला. या आदेशात उद्धृत करण्यात आलेली तत्त्वे सुध्दा दिनांक ०१ एप्रिल, २००७ ते ३१ मार्च, २०१० या तीन वर्षाच्या नियंत्रण कालावधीसाठी लागू राहतील.

या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये-

(ए) टीपीसी- पारेषण व्यवसायाची कामगिरीची मार्गदर्शिका, वीज दराच्या विनियमांनुसार ठरवून देण्यात आली.

(बी) आयोगाने नियंत्रण कालावधीकरिता राज्यांतर्गत पारेषण हानि ४.८५ टक्के इतकी विचारात घेतली.

(सी) आयोगाने निश्चित केलेले स्थिर आकार पूर्णपणे वसूल करण्यास पात्र होण्याकरिता, वीज दराच्या विनियमात ठरवून देण्यात आल्याप्रमाणे यंत्रणेच्या उपलब्धतेची पातळी राखण्यास टीपीसीला निर्देश देण्यात आले.

**आरईएल -पारेषण व्यवसायाचा बहु-वर्षीय वीज दराचा आदेश**

आरईएलच्या प्रस्तावावर जाहीर सुनावणी घेण्यात आली. पारेषण हानीची पातळी, भांडवली खर्च व भांडवलीकरण आणि अन्य व्यवसायांपासूनचे उत्पन्न, हे या सुनावणीतील मुख्य आक्षेप होते.

आयोगाने दिनांक ०२ एप्रिल, २००७ च्या आदेशाद्वारे नियंत्रण कालावधीकरिता आरईएल-पारेषण व्यवसायाची वार्षिक महसुलाची गरज आणि दिनांक ०१ एप्रिल, २००७ ते ३१ मार्च, २००८ पर्यंत लागू असलेला वीज दर निश्चित केला. या आदेशात उद्धृत करण्यात आलेली तत्त्वे सुध्दा दिनांक ०१ एप्रिल, २००७ ते ३१ मार्च, २०१० या तीन वर्षाच्या नियंत्रण कालावधीसाठी लागू राहतील.

या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये-

(ए) आयोगाने आर्थिक वर्ष २००६-०७ करिता मंजूर केलेले खर्च, बहु-वर्षीय वीज दराच्या नियंत्रण कालावधीकरिता, आधारभूत आकडेवारी म्हणून, आयोगाने विचारात घेतली.

(बी) आयोगाने, मान्यताप्राप्त सविस्तर प्रकल्प अहवालांच्या (डीपीआर) आधारे भांडवली खर्चाशी निगडीत खर्च मंजूर केले आणि सविस्तर प्रकल्प अहवाल नसलेल्या प्रकरणी, प्रस्तावित भांडवली खर्चाच्या ५० टक्के खर्च विचारात घेतला.

(सी) आयोगाने, लागू असलेल्या भाववाढीच्या निर्देशांकानुसार, संचालन व सुव्यवस्था खर्चातील भाग म्हणजेच, कर्मचाऱ्यांवरील खर्च, प्रशासन व सर्वसाधारण (ए आणि जी) खर्च आणि दुरुस्ती व सुव्यवस्था खर्च, अंदाजित केले.

(डी) नियंत्रण कालावधीकरिता, दीर्घ-मुदतीच्या कर्जावरील प्रमाणकानुसारी व्याज-दर, ८ टक्के इतका विचारात घेतला.

(इ) आयोगाने, आर्थिक वर्ष २००६-०७ करिता मान्यता दिलेल्या प्राप्तिकराच्या धर्तीवर, संपूर्ण नियंत्रण कालावधीकरिता रु. ४.५३ कोटीच्या प्राप्तिकरास मंजूरी दिली.

## महावितरण कंपनी, मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी, बेस्ट, टीपीसी आणि आरईएल करिता आकारांची अनुसूची

यापूर्वी, परवानेधारक त्यांच्या स्वतःच्या आकारांच्या अनुसूचीनुसार वीज पुरवठा करावयाचे काम करीत होते. विद्युत अधिनियम, २००३ खाली आकारांची अनुसूची निश्चित करण्याचे कायदेशीर बंधन आयोगावर आहे. वितरण

परवानाधारकांकडून वीज पुरवठा मिळविण्यासाठी सध्याच्या/भावी विद्युत ग्राहकांनी भरावयाच्या रकमांचा उल्लेख आकारांच्या अनुसूची मध्ये असतो. यामध्ये, छाननी शुल्क आणि मंजूर विद्युत भारासाठी आकारणी, पुनर्जोडणीसाठी आकार, मीटर्सच्या ठिकाणातील बदलासाठी आकार, इ. आकारांचा समावेश असतो.

जाहीर नोटीस आणि सुनावणीच्या माध्यमातून सर्व इच्छुक व्यक्ति/संस्थांची मते विचारात घेऊन, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४६ खाली, विद्युत पुरवठा संहिता विनियमांनुसार, पाच वितरण परवानाधारकांची आकारांची अनुसूची, आयोगाने प्रथमच निश्चित केली.

स्वतंत्र वितरण फीडर्स आणि नवीन विद्युत ग्राहक मोठ्या प्रमाणात (वाढीव क्षमतेच्या २५ टक्क्यांहून अधिक असल्यास) वापरत असलेल्या सध्याच्या सुविधांमध्ये वाढ मागितली असल्यास, अशी प्रकारणे वगळून, आयोगाने मान्यता दिलेल्या अनुसूचीमध्ये सेवा वाहिनी आकार (एस.एल.सी.) रद्द केला.

*आकारांच्या अनुसूचीला मान्यता देण्यापूर्वी, ग्राहकाला नवीन वीज जोडणी देताना त्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामाच्या अंदाजित खर्चावर आधारित आकार परवानेधारक वसूल करीत होते. यासाठी पाळण्यात येणारी पध्दत नीरस होती; ज्यामध्ये जागेची पाहणी, सेवा वाहिनी/केबल टाकणे, या कामाच्या खर्चाचा मोजमापाच्या आधारे अंदाज करणे, अंदाजित खर्च काढणे, अंदाजित खर्चास मंजूरी देणे व शेवटी अर्जदारास दरपत्रक पाठविणे, अशा अनेक कामांचा समावेश होता. नवीन वीज जोडणी देण्याची पध्दत सुलभ करणे व क्षेत्रीय पातळीवर होणारी मनमानी तसेच उपस्थित होणारे वाद टाळण्याच्या हेतूने, यापूर्वीची अंदाजित खर्चाच्या आधारे आकारणी करण्याची पध्दत बंद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, नवीन वीज जोडणीसाठी मोजमापाच्या आधारे आकारणी करण्याची पध्दतही आयोगाने बंद केली आहे. त्या ऐवजी, सेवा वाहिनी आकारांसाठी (कामाच्या सरासरी खर्चावर आधारित) प्रमाणकानुसारी दर लागू करण्यात आले आहेत. मंजूर केलेले सेवा वाहिनी आकार हे सोप्या तक्त्यात देण्यात आले आहेत. ते ग्राहक व परवानेधारक यांना 'रेडी रेकनर' म्हणून उपयोगी पडतील.*

*आयोगाने, सेवा वाहिनी आकार या शीर्षकाखालील पायाभूत सुविधांच्या खर्चाची वसूली, स्वतंत्र वितरण सुविधा आणि नवीन विद्युत ग्राहकांची विजेची मागणी मोठ्या प्रमाणात (वाढीव क्षमतेच्या २५ टक्क्याहून अधिक) असल्यास अशी प्रकरणे वगळून, रद्द केली. विद्युत आधिनियम, २००३ मधील कलम ४२ नुसार पायाभूत सुविधांविषयीची जबाबदारी परवानेधारकांची असल्यामुळे, पायाभूत सुविधांवरील खर्चाची मागणी वीज दर निश्चितीकरणाच्या वेळी वार्षिक महसुलाच्या गरजेत समाविष्ट करण्यास परवानेधारकांना सांगण्यात आले.*

**नूतनशील ऊर्जा स्रोतांचा दीर्घ-कालीन विकास आणि नूतनशील ऊर्जा खरेदीच्या तपशीलाची (आर पी एस) माहिती**

पवन उर्जा, जल, बगास, बायोमास, सौर आणि नगरपालिकेचे घन-कचरा तंत्रज्ञान, यासारख्या नूतनशील ऊर्जा स्रोतांमुळे कार्बन आणि इतर उत्सर्जनाचे प्रमाण कमी होते आणि असे ऊर्जा स्रोत देशाच्या व राज्याच्या ऊर्जा स्रोतांमध्ये मोलाची भर घालतात. नूतनशील स्रोतांपासून वीज निर्मितीस चालना देण्याकरिता विद्युत अधिनियम, २००३ मध्ये अनेक तरतुदी आहेत. या तरतुदींपैकी सर्वात महत्त्वाच्या तरतूदीनुसार या नूतनशील स्रोतांकडून प्राप्त करुन घ्यावयाच्या विजेची किमान टक्केवारी राज्य विद्युत नियामक आयोगाने निश्चित करणे आवश्यक आहे.

विद्युत अधिनियम, २००३ अंमलात येण्यापूर्वीसुध्दा, नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनासंबंधीचे (रिन्युएबल पर्चेस ऑब्लिगेशन- आरपीओ) आदेश आयोगाने पारित केले होते. त्यानुसार, वितरण परवानेधारकांनी राज्यातील नूतनशील ऊर्जा निर्मिती सम-प्रमाणात घेणे आवश्यक होते.

विद्युत अधिनियम, २००३ नुसार, नूतनशील ऊर्जा स्रोतांचा दीर्घ-कालीन विकास आणि नूतनशील ऊर्जा खरेदीच्या तपशीलाची (आर पी एस) चौकटीबाबत, आयोगाने दिनांक १६ ऑगस्ट, २००६ रोजी आदेश पारित केले. या आर पी एस चौकटीची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -

(ए) **आर पी एस नुसार ऊर्जा खरेदीच्या टक्केवारीचा तपशील:** प्रत्येक पात्र व्यक्तीस पात्र नूतनशील ऊर्जा स्रोताकडून निर्माण झालेली वीज खाली ठरवून देण्यात आलेल्या टक्केवारीनुसार प्राप्त करुन घ्यावी लागेल. यापूर्वी, ज्या नूतनशील ऊर्जा स्रोतांकडे निर्माण झालेली वीज विक्रीसाठी उपलब्ध होती, अशी वीज खरेदी करण्याचा पर्याय पात्र व्यक्तीस होता. जर वीज उपलब्ध नसेल तर विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात ही वीज पात्र व्यक्तींना आता स्वतः निर्माण करावी लागते.

| वर्ष | (आरपीएस खाली) नूतनशील ऊर्जाखरेदीच्या टक्केवारीचा तपशील |
|---|---|
| २००६-०७ | ३.०% |
| २००७-०८ | ४.०% |
| २००८-०९ | ५.०% |
| २००९-१० | ६.०% |

आर पी एस चौकटीच्या प्रयोजनार्थ, प्रत्येक वितरण परवानाधारकाच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रातील विजेचा एकूण वापर यामध्ये, वितरण परवानाधारकाने पुरवठ्याच्या क्षेत्रात ऊर्जेच्या पुरवठ्यासाठी सर्व स्रोतांकडून खरेदी केलेली ऊर्जा, मुक्त प्रवेश ग्राहक आणि स्व-वापराच्या वीज निर्मिती प्रकल्पांना पुरवठा केलेली वीज, यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे, प्रत्येक मुक्त प्रवेश ग्राहक आणि स्व-वापराच्या वीज निर्मिती प्रकल्पांकरिता, आर पी एस टक्केवारी त्याच्या वीज वापराच्या त्या भागाला लागू राहील, जी वीज त्याच्या स्वतःच्या वीज निर्मिती प्रकल्पामधून निर्माण झालेली असेल किंवा त्याने त्याकरिता अन्य पुरवठादारांशी करार केलेला असेल. वितरण परवानाधारकाने पुरवठा केलेल्या विजेच्या परिमाणावर आर पी एस टक्केवारी लागू राहणार नाही.

(बी) **पात्र नूतनशील ऊर्जा स्रोत:** भारत सरकारच्या अपारंपरिक आणि नूतनशील ऊर्जा स्रोत (एम एन आर ई एस) मंत्रालयाने मान्यता दिल्याप्रमाणे सर्व प्रकारच्या नूतनशील ऊर्जा स्रोतांकडून झालेल्या ऊर्जा निर्मितीचा विचार करण्यात येईल. तसेच, फक्त ग्रीडशी जोडलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती प्रकल्पांकडून झालेल्या वीज निर्मितीचा आर पी एस चौकटी खाली विचार करण्यात येईल आणि ग्रीडशी न जोडलेल्या किंवा एकाकी प्रकल्पांकडून झालेल्या ऊर्जा निर्मितीचा विचार करण्यात येणार नाही.

(सी) **पात्र व्यक्ती:** विनिर्दिष्ट करण्यात आलेली किमान टक्केवारी ही महाराष्ट्रातील सध्याच्या व भविष्यातील सर्व वितरण परवानेधारकांना तसेच मुक्त प्रवेश आणि स्व-वापरासाठीचे वीज निर्मिती प्रकल्प, या ग्राहकांना लागू राहील.

(डी) **लागू असलेला वीज दर:** (अ) अ-खनिज इंधनावर आधारित (अर्हताप्राप्त) सह-निर्मिती प्रकल्प, (ब) अ-खनिज इंधनावर

आधारित (अर्हता नसलेले) सह–निर्मिती प्रकल्प, (क) पवन ऊर्जा प्रकल्प, (ड) नगरपालिकेच्या घन–कचऱ्यापासूनचे वीज निर्मिती प्रकल्प, या प्रकरणी वीज दराच्या आदेशात मंजूर करण्यात आलेले वीज दर आणि वीज दराच्या रचनेची मुदत आर पी एस चौकटी खाली ३१ मार्च, २०१० पर्यंत वाढविण्यात येईल. अन्य कोणत्याही नूतनशील ऊर्जा स्रोत किंवा नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाच्या संबंधी, प्रत्येक प्रकारचे नूतनशील ऊर्जा स्रोत आणि प्रत्येक प्रकारचे तंत्रज्ञान, यांच्या बाबतीत आयोग वीज दर स्वतंत्रपणे निश्चित करेल.

(इ) **अंमलबजावणी:** पात्र व्यक्तींना आर पी एस खालील बंधनांचे अनुपालन करावे लागेल. आर पी एस चौकटीखाली पहिल्या वर्षामध्ये, म्हणजेच आर्थिक वर्ष २००६–०७ मध्ये, अंमलबजावणीसाठी कोणतेही आकार लावण्यात येणार नाहीत. तथापि, आर्थिक वर्ष २००७–०८ मध्ये रु. ५.०० या दराने, २००८–०९ मध्ये रु. ६.०० या दराने, आणि २००९–१० मध्ये रु. ७.०० या दराने, कमी पडणाऱ्या प्रत्येक युनिटकरिता, पात्र व्यक्ती भरणा करण्यास जबाबदार राहतील. नूतनशील ऊर्जा प्राप्त करुन घेण्यासाठी कमी पडणाऱ्या युनिट्सकरिता वितरण परवानाधारकांवर लावण्यात आलेले आकार, ग्राहकांकडून वसूल करावयाचे खर्च म्हणून त्यांच्या वार्षिक महसुलाच्या गरजेमध्ये दाखविता येणार नाहीत.

**पुणे सर्कलमधील भार नियमन शिथील करण्यासाठी होणारा अतिरिक्त खर्च रिलायेबिलिटी अधिभार म्हणून वसूल करण्यास मान्यता देण्यासाठी महावितरण कंपनीचा प्रस्ताव**

आयोगाने यापूर्वीच्या आदेशांद्वारे महावितरण कंपनीला, पुणे अर्बन सर्कल मधील भार नियमन शिथील करण्यासाठी त्या भागातील स्व–वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांकडील शिल्लक विद्युत निर्मिती क्षमतेचा वापर करण्याचे निर्देश दिले होते. तसेच स्व–वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पाच्या प्रमाण इंधन कार्यक्षमतेस आणि वीज निर्मितीच्या अस्थिर खर्चास देखील मंजूरी दिली होती.

त्यानंतर, महावितरण कंपनीने पुणे सर्कलमधील भार नियमन शिथील करण्याकरिता रिलायेबिलिटी अधिभारास मान्यता देण्यासाठी दिनांक ०५ एप्रिल, २००६ रोजी प्रस्ताव दाखल केला. महावितरण कंपनीने त्यांच्या याचिकेत सुचविले की, दर महिना ३०० युनिट्सपेक्षा कमी वापर करणाऱ्या निवासी ग्राहकांना रिलायेबिलिटी अधिभार आकारणीतून सूट देण्यात यावी.

वरील प्रस्तावावर हितसंबंधितांची मते जाणून घेण्यासाठी पुणे येथे दिनांक १५ एप्रिल, २००६ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. भार नियमन शिथील करण्यासाठी होणाऱ्या अतिरिक्त खर्चाची वसूली रिलायेबिलिटी–अधिभार म्हणून करण्यास मान्यता देण्याकरिता दिनांक १६ मे, २००६ रोजी अंतीम आदेश आयोगाने पारित केला. निवडक भागातील भार नियमन शिथील करण्याच्या दृष्टीने या सार्वजनिक–खाजगी भागीदारी मॉडेलची अंमलबजावणी यशस्वीरित्या करण्यात आली आणि याच धर्तीवर राज्याच्या आणि देशाच्या अन्य भागात प्रयोग करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे–

ए) ही योजना कार्यान्वित होताच, पुणे अर्बन सर्कलमध्ये भार नियमन होणार नाही, तसेच औद्योगिक ग्राहकांना सक्तीची सुट्टी घ्यावी लागणार नाही अणि पुणे अर्बन सर्कलमधील ग्राहकांना, दैवी आपत्तीच्या घटना आणि देखभालीसाठीचे बंद वगळता, अखंडीत वीज पुरवठा होईल, याची खात्री करुन घेण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला दिले.

बी) 'सीआयआय' चा प्रस्ताव कार्यान्वित झाल्यानंतर जर पुणे अर्बन सर्कलच्या विद्युत पुरवठ्यात व्यत्यय झाल्यास, पुरवठा न झाल्याचा कालावधी व त्यामागची कारणे, याबाबतचा अहवाल, अशी घटना घडल्यानंतर तीन दिवसांच्या आत, सादर करण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला दिले.

सी) अंदाजित व प्रत्यक्ष अतिरिक्त खर्च आणि रिलायेबिलिटी आकारांपासून मिळणारा अंदाजित व प्रत्यक्ष महसूल यांच्यामधील तफावतीचे समायोजन महावितरण कंपनीची वार्षिक महसुलाची गरज ठरविताना विचारात घेण्यात यावे. सदर रक्कम पुणे अर्बन सर्कलमधील रिलायेबिलिटी आकार लागू असलेल्या ग्राहकांकडून वसूल करण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला दिले.

डी) पुणे अर्बन सर्कलमधील दरमहा ३०० युनिट्सपर्यंत विजेचा वापर असणारे निवासी ग्राहक वगळून इतर सर्व ग्राहकांना ४२ पैसे प्रति युनिट रिलायेबिलिटी अधिभार आकारण्यास आयोगाने मान्यता दिली.

**स्पर्धात्मक बोलीच्या प्रक्रियेद्वारे महावितरण कंपनीची दीर्घ–कालीन वीज खरेदी**

आयोगाने महावितरण कंपनीच्या प्रस्तावावर, स्पर्धात्मक बोलीच्या प्रक्रियेद्वारे दीर्घ–कालीन वीज खरेदीबाबतचा आदेश पारित केला. आयोगाने या वर्षात पारित केलेल्या आदेशांपैकी हा आणखी एक महत्वाचा आदेश होता. स्पर्धात्मक बोलीच्या प्रक्रियेद्वारे दीर्घ–कालीन वीज खरेदीबाबतचे दस्तऐवज केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने प्रमाणीकृत केले आहेत. या प्रमाणीकृत दस्तऐवजांशी फारकत घेऊन सादर केलेल्या वेगळ्या दस्तऐवजांचा तपशील महावितरण कंपनीने दिला नव्हता. त्यामुळे, प्रमाणीकृत दस्तऐवजांऐवजी जे वेगळे दस्तऐवज सादर करण्याचे प्रस्तावित केले त्यांचा संक्षिप्त गोषवारा समर्थनासह सादर करण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला दिले.

महावितरण कंपनीच्या प्रस्तावावर, दिनांक २८ जुलै, २००६ रोजी झालेल्या जाहीर सुनावणीमध्ये अनेक आक्षेप/सूचना आयोगाकडे आल्या. आयोगाने महावितरण कंपनीला निर्देश दिले की, वीज मागणीचे अंदाज, ते कसे करण्यात आले त्याबाबतच्या कार्यपध्दतीची मिमांसेसह, दीर्घ–कालीन वीज प्राप्त करुन घेण्याची योजना मंजूरीसाठी सादर करावी. आक्षेप/सूचनांचे विश्लेषण आणि महावितरण कंपनीने सादर केलेली आकडेवारी, या आधारे, आयोगाने एक आदेश पारित केला. सदर आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे –

ए) महावितरण कंपनीने तज्ज्ञांच्या मदतीने विजेच्या मागणीचा शास्त्रशुध्द अंदाज करण्याचे काम हाती घेणे.

बी) विजेच्या मागणीचे कोणतेही दीर्घ–कालीन अंदाज किंवा दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या प्रमाणात वीज प्राप्त करुन घ्यावयाच्या प्रस्तावामागील कारणमीमांसा महावितरण

कंपनीने सादर केली नव्हती तरी महावितरण कंपनीला २००० मेगावॅट वीज प्राप्त करुन घेण्याकरिता अर्हता विनंती-अर्ज (रिक्वेस्ट फॉर क्वालिफिकेशन-आरएफक्यु) प्रकिया सुरु करण्यासाठी परवानगी देणे.

सी) केस-१ अंतर्गत स्पर्धात्मक बोली लावण्याची महावितरण कंपनीची इच्छा असेल तर प्रकल्पाची जागा किंवा वीज पोचविण्याचे विशिष्ट ठिकाण महाराष्ट्रात असावे यासाठी आग्रह महावितरण कंपनी धरु शकणार नाही; कारण या बाबी केस १ अंतर्गत स्पर्धात्मक बोलीच्या प्रक्रियेच्या व्याप्तीमध्ये येत नाहीत.

डी) स्पर्धात्मक बोलीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वेळेच्या काल-मर्यादांचे पालन महावितरण कंपनीने काटेकोरपणे करणे.

इ) प्रमाणीकृत बोली दस्तऐवजांपासूनच्या फक्त तफावती महावितरण कंपनीने सादर करणे; कारण संपूर्ण बोली दस्तऐवजच आयोग मंजूर करणार नाही.

**मुक्त प्रवेशाकरिता क्रॉस-सबसिडी अधिभाराची परिगणना**

क्रॉस-सबसिडी अधिभाराची परिगणना करण्याची प्रस्तावित पध्दती-मीमांसा आरईएलने दिनांक १० सप्टेंबर, २००४ च्या पत्राने सादर केली आणि टीपीसीने 'सेवेप्रमाणे खर्च पध्दतीची मीमांसा' ('कॉस्ट टु सर्व्ह मेथोडॉलॉजी') दिनांक १२ ऑक्टोबर, २००५ च्या पत्राने सादर केली. तथापि, महावितरण कंपनीने 'क्रॉस-सबसिडी अधिभाराची परिगणना' किंवा 'कॉस्ट टु सर्व्ह मेथोडॉलॉजी' सादर केली नव्हती. त्याशिवाय, आरईएलने मविनिआ ( वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००४ खाली माहिती सादर केली होती; तथापि, सदर माहिती आयोगाच्या सुधारित विनियमांखाली सादर केलेली नव्हती. त्यामुळे, आयोगाकडे मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ खाली कोणताही प्रस्ताव आला नव्हता.

या बाबी विचारात घेऊन, आयोगाने दिनांक १० जानेवारी, २००६ च्या पत्राने वितरण परवानेधारकांना क्रॉस-सबसिडी अधिभाराची परिगणना करण्यासाठी त्यांचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. आयोगाने आपल्या पत्रात ठरवून दिलेल्या मुदतीत कोणत्याही वितरण परवानाधारकाने प्रस्ताव सादर केला नाही. आरईएलने त्यांचा प्रस्ताव दिनांक २६ जून, २००६ रोजी पुन्हा सादर केला.

दरम्यान, केंद्र सरकारने दिनांक ०६ जानेवारी, २००६ रोजी वीज दराचे धोरण अधिसूचित केले, ज्यामध्ये मुक्त प्रवेशाकरिता क्रॉस-सबसिडी अधिभाराची परिगणना करण्यासाठीचे सूत्र विनिर्दिष्ट करण्यात आले होते. त्यानुसार 'राज्यामधील मुक्त प्रवेशांकरिता क्रॉस-सबसिडी अधिभाराची परिगणना करण्याची पध्दत' यावर एक दृष्टिकोन पत्रिका दिनांक २९ मे, २००६ रोजी आयोगाने प्रसिध्द केली आणि दिनांक २० जून, २००६ रोजी एक जाहीर सुनावणी घेण्यात आली.

उचित जाहीर प्रक्रियेनंतर, महाराष्ट्र राज्यातील मुक्त प्रवेशांकरिता आणि क्रॉस-सबसिडी अधिभाराची परिगणना करण्याची चौकट आणि सूत्र आयोगाने दिनांक ०५ सप्टेंबर, २००६ रोजी ठरवून दिले. प्रत्येक परवानाधारकाचा वीज दर निश्चित करतेवेळी, क्रॉस-सबसिडी अधिभाराची परिगणना या पध्दतीनुसार करण्यात येईल.

आयोगाने निर्देश दिले की-

१. खालील प्रकरणे वगळता, सर्व मुक्त प्रवेशांकरिता क्रॉस-सबसिडी अधिभार द्यावा लागेल-

ए) आयोगाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांनुसार, विद्युत कंपनीकडून पुरवठा होत नसलेल्या विजेच्या परिमाणाकरिता.

बी) नूतनशील ऊर्जा स्रोतांकडून वीज खरेदी करीत असलेले मुक्त प्रवेश ग्राहक.

सी) विद्युत अधिनियम, २००३ लागू झालेल्या दिनांकाच्या दिवशी असलेल्या मुक्त प्रवेशांकरिता.

२. आर्थिक वर्ष २००६-०७ या आधारभूत वर्षासाठी परिगणना करण्यात आलेला क्रॉस-सबसिडी अधिभार हा, आर्थिक वर्ष २०१०-११ अखेर २० टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात यावा.

३. क्रॉस-सबसिडी अधिभार आकारणीतून नवीन ग्राहकांना माफी देण्यात येणार नाही.

४. ज्या मुक्त प्रवेशांकरिता द्रव इंधनावर आधारित औष्णिक वीज निर्मितीचा वापर होत आहे त्यांनादेखील वरील क्रॉस-सबसिडी अधिभार द्यावा लागेल.

## राज्य भार प्रेषण केंद्राचे आर्थिक वर्ष २००७-०८ साठी अंदाजपत्रक

महाराष्ट्राच्या राज्य पारेषण कंपनीने (एसटीयु) म्हणजेच महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांनी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या आर्थिक वर्ष २००७-०८ करिता अंदाजपत्रक मंजूरीची याचिका दिनांक २५ जानेवारी, २००७ रोजी आयोगास सादर केली. आयोगाने महावितरणला अतिरिक्त माहिती सादर करण्याचे निर्देश दिले; जी दिनांक २२ फेब्रुवारी, २००७ रोजी सादर करण्यात आली. वितरण परवानाधारकांच्या उपस्थितीत आयोगाने दिनांक २३ फेब्रुवारी, २००७ रोजी या प्रकरणी सुनावणी घेतली. सुनावणीच्या वेळी, आयोगाने असे मत व्यक्त केले की, विद्युत अधिनियम, २००३ खाली अभिप्रेत असलेली भूमिका राज्य भार प्रेषण केंद्राला पार पाडावयाची असल्याने, राज्य भार प्रेषण केंद्राचे कामकाजातील स्वातंत्र्य निर्विवादपणे सिध्द झाले पाहिजे. आयोगाने दिनांक २८ मार्च, २००७च्या आदेशाने राज्य भार प्रेषण केंद्राच्या आर्थिक वर्ष २००७-०८च्या अंदाजपत्रकास मंजूरी दिली.

या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

ए) आयोगाने असे मत व्यक्त केले की, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने कामकाजात स्वायत्तता राखावी आणि महापारेषण कंपनीपासून स्वतःची वेगळी ओळख ठेवावी ज्यामुळे भांडवली खर्चाच्या (कॅपेक्स) योजनांना मंजूरी, विशेषतः महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राशी निगडीत कार्याकरिता कर्ज मंजूरी, इ.बाबत आर्थिक स्वातंत्र्य अबाधित राखता येईल .

बी) आयोगाने असेही मत व्यक्त केले की, राज्य भार प्रेषण केंद्राने भांडवली खर्चाच्या (कॅपेक्स) योजना- योजनेचा तपशील, रुपरेषा, आणि योजनेचा उद्देश- सविस्तर प्रकल्प अहवालासह सादर करुन त्यास आयोगाची मान्यता घेणेही आवश्यक आहे.

सी) आयोगाने पुढे असेही मत व्यक्त केले की, विद्युत अधिनियम, २००३ मध्ये प्रत्येक राज्याकरिता एकच राज्य भार प्रेषण केंद्र अभिप्रेत असल्याने, सध्याचे कळवा येथील राज्य भार प्रेषण केंद्र हे स्वतंत्र रहावे आणि मुंबई क्षेत्रातील परवानेधारकांकरिता माहिती गोळा करण्यासाठी त्याने टीपीसी वर अवलंबून रहाणे, ही प्रथा योग्य नाही.

डी) आयोगाने असे मत व्यक्त केले की, राज्य भार प्रेषण केंद्राने उत्पन्नांच्या स्रोतांच्या नियोजनाच्या बाबीसह गरजेवर आधारित अंदाजपत्रक मंजूरीसाठी सादर करावे.

इ) महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकरिता सविस्तर व्यवसाय आराखडा त्यामध्ये संघटनात्मक आणि व्यवस्थापकीय आराखडा, आर्थिक व प्रशासकीय अधिकारांचे प्रदान, लेख्यांचे अलगीकरण, कर्मचारी प्रतिनियुक्ती आणि मनुष्यबळ धोरण, इ. बाबी स्पष्टपणे दाखवून आणि मुंबईतील प्रेषण कार्याचा ताबा घेण्याची योजना- त्यासाठीच्या संक्रमण व्यवस्थेच्या योजनेसह, सादर करण्याचे निर्देश आयोगाने महापारेषण कंपनीला दिले.

एफ) आयोगाला असे आढळून आले की, आर्थिक वर्ष २००६-०७ करिता महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला लागणारी संपूर्ण अंदाजपत्रकीय तरतुदीची रक्कम सदर केंद्र महावितरण कंपनीकडून वसूल करीत होते. त्यामुळे आयोगाने असे मत व्यक्त केले की, राज्य भार प्रेषण केंद्राच्या शुल्क आणि आकारांची आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये जादा/कमी वसूली झाल्यास त्याचे समायोजन, महावितरण कंपनीने शुल्क व आकारापोटी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला भविष्यात देय असलेल्या रकमेपोटी करण्यात येईल.

राज्य भार प्रेषण केंद्राच्या शुल्क आणि आकारांच्या वसूलीची रचना खालीलप्रमाणे आहे-

(अ) राज्य भार प्रेषण केंद्राचे वार्षिक शुल्क

(ब) राज्य भार प्रेषण केंद्र चालविण्याचे वार्षिक आकार

वितरण परवानाधारकाने मागील वर्षात को-इन्सिडंट शिखर मागणी ज्या प्रमाणात मेगावॅटमध्ये भागविली त्या प्रमाणात, राज्य भार प्रेषण केंद्राचे वार्षिक शुल्क आणि राज्य भार प्रेषण केंद्र चालविण्याचे वार्षिक आकार लावण्यात आले आहेत. यापैकी राज्य भार प्रेषण केंद्राचे वार्षिक शुल्क १० एप्रिल आणि १० ऑक्टोबर याप्रमाणे वर्षातून दोन वेळा तर राज्य भार प्रेषण केंद्र चालविण्याचे वार्षिक आकार मासिक तत्त्वावर वसूल करावयाचे आहेत.

**राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा आर्थिक वर्ष २००६-०७ करिता पारेषण दर**

आयोगाने, दिनांक २९ सप्टेंबर, २००६ च्या आदेशाने राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकरिता आर्थिक वर्ष २००६-०७ करिता पारेषण दर निश्चित केले. हे दर दिनांक ०१ ऑक्टोबर, २००६ ते ३१ मार्च, २००७ या कालावधीकरिता लागू राहतील.

या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -

ए) एकत्रित विद्युत यंत्रणा कार्यान्वित असताना राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा संयुक्त पारेषण तोटा हा पारेषण यंत्रणेच्या सर्व उपयोगकर्त्यांना, ते यंत्रणेचा वापर करतात त्या प्रमाणात, सहन करावा लागेल, असे आयोगाने निक्षून सांगितले. पारेषण तोटे निश्चित करण्याची सविस्तर पध्दती-मीमांसा, राज्य भार प्रेषण केंद्राने घेतलेल्या विद्युत मीटर्समधील वाचनाच्या नोंदीवर आधारित असेल.

बी) प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने (पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता किंवा वितरण परवानाधारक) उचललेल्या एकूण विजेची तुलना, करार केलेल्या विजेशी (स्व-निर्मित किंवा संबंधित पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने केलेल्या विजेच्या खरेदीद्वारे) करुन, संबंधित पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने जादा किंवा कमी वीज खेचली आहे अथवा नाही, हे ठरविण्यात येईल. विविध पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांनी खेचलेल्या जादा किंवा कमी विजेचा मेळ हा, त्या महिन्यात असलेल्या भारांकित (व्हेटेड) सरासरी यंत्रणा सीमांतिक किंमतीने, घालण्यात येईल. ती रक्कम, जादा वीज खेचणाऱ्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून कमी वीज खेचणाऱ्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला अदा करण्यात येईल.

सी) अशा वीज जादा/कमी खेचण्याच्या व्यवहारांचे आर्थिक मेळ घालण्याकरिता राज्य भार प्रेषण केंद्राने मध्यवर्ती संचित (पूलिंग) व्यवस्था विकसित करण्यावर आयोगाने भर दिला.

डी) आयोगाने स्पष्ट केले की, वीज खरेदी करारानुसार प्रत्यक्षात दिलेल्या विजेच्या आधारे, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांनी (किंवा वितरण परवानाधारकांनी) वीज निर्मिती कंपन्यांना रक्कम भरणा करीत रहावी.

इ) आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० करिता बहु-वर्षीय वीज दरांतर्गत वार्षिक महसुलाची गरज आणि वीज दर निश्चित करण्यासाठीचा अर्ज दिनांक ३० नोव्हेंबर, २००६ पर्यंत सादर करण्याचे निर्देश आयोगाने पारेषण परवानाधारकांना दिले.

**राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा आर्थिक वर्ष २००७-०८ करिता पारेषण दर**

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकरिता पारेषण दराबाबतचा आयोगाचा आदेश, हा यापूर्वी महाराष्ट्रासाठी ठरविलेल्या पारेषण किंमतीच्या चौकटीवर आधारित होता. पारेषण परवानेधारकांनी सादर केलेल्या बहु-वर्षीय वीज दराच्या याचिकांच्या सविस्तर छाननीनंतर, पहिल्या नियंत्रण कालावधीकरिता, त्यांची वार्षिक महसूलाची गरज, आयोगाने दिनांक ०२ एप्रिल, २००७ च्या आदेशाने निश्चित केली. पारेषण यंत्रणेचा मान्यताप्राप्त एकूण खर्च आणि मान्यताप्राप्त पायाभूत पारेषण क्षमता वापर यांच्या आधारे आयोगाने राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे दर निश्चित केले.

आयोगाने स्पष्ट केले की, दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाला लागू असलेल्या पारेषण दराच्या २५ टक्के दर अल्प-कालीन मुक्त प्रवेशांकरिता राहील; त्याशिवाय, अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून मिळालेली रक्कम, पारेषण यंत्रणेचा एकूण खर्च कमी करण्यासाठी वापरण्यात यावी ज्याचा फायदा पारेषण यंत्रणेचा दीर्घ-कालीन वापर करणाऱ्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या उपयोगकर्त्यांना होईल.

**वितरण परवानाधारकांना लागू असलेल्या सर्वसाधारण अटी आणि विशिष्ट अटी**

परवानेधारकांकरिता किंवा परवानेधारकांच्या वर्गासाठी आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ च्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या आणि पाचव्या परंतुकाखाली संबोधित करण्यात आलेले परवानेधारक यांच्याकरिता सर्वसाधारण आणि/किंवा विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करण्याची वैधानिक जबाबदारी, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ खाली, आयोगावर आहे.

विद्युत परवानेधारकांकरिता सर्वसाधारण अटींच्या प्रारुपास पूर्व प्रसिध्दी देणे, सुनावणी घेणे, या प्रथांचे उचित पालन करुन, तसेच राज्यातील वितरण परवानेधारक, ग्राहक प्रतिनिधी आणि अन्य हितचिंतक यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचना विचारात घेऊन, आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ अधिसूचित केले. या विनियमांमुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना अटी) विनियम, २००४ अधिक्रमित झाले आहेत.

**विद्युत ग्राहक हक्क विवरणपत्र**

सर्वसमावेशक 'विद्युत ग्राहक हक्क विवरणपत्र' तयार करणे हा, या वर्षात आयोगाने स्वतःहून घेतलेला महत्वाचा पुढाकार होता. या विवरणपत्रास दिनांक ०१ ऑगस्ट, २००६ रोजी मंजूरी देण्यात आली.

हे विवरणपत्र, विद्युत अधिनियम, २००३ खाली विद्युत ग्राहकांना असणारे सर्व अधिकार, अधिक तपशीलवारपणे स्पष्ट करते. तसेच त्यामुळे दुहेरी उद्देश साध्य होतो- एक म्हणजे, उपलब्ध असणाऱ्या अधिकारांविषयी जागृती निर्माण झाल्यामुळे ग्राहक स्वतःचे रक्षण करण्यास समर्थ होतात आणि दुसरे म्हणजे विद्युत वितरण कंपन्यांच्या क्षेत्रातील वीज पुरवठा, सुरक्षा अनामत व देयक आकारणी या बाबींच्या संदर्भात कोणती वाजवी अपेक्षा करता येऊ शकते, याची माहितीही ग्राहकांना मिळते.

नवीन वीज जोडणी मिळण्याची कार्यपध्दती, वीज जोडणी तोडण्यापूर्वी नोटीस मिळण्याचा अधिकार व योग्य प्रक्रियेचे पालन आणि पुनर्जोडणीची कार्यपध्दती, वीज वितरण कृतीची मानके, तक्रार हाताळण्याची आणि गाऱ्हाणे निवारण्याची यंत्रणा आणि निवडीप्रमाणे विद्युत पुरवठादार निवडण्याचा ग्राहकांचा अधिकार, या बाबी या विवरणपत्रात सविस्तरपणे मांडण्यात आल्या आहेत.

**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल (ओम्बड्समन)**

*विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२ (५)नुसार, आयोगाने दिनांक २० एप्रिल, २००६ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ हे व्यापक विनियम प्रसिध्द केले. ग्राहकांच्या गाऱ्हाण्यांच्या निवारणासाठी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांची स्थापना करण्याकरिता आणि ग्राहकांच्या गाऱ्हाण्याचे निवारण न झाल्यास अभिवेदन सादर करण्याकरिता या विनियमात आयोगाने राज्यातील वितरण परवानेधारकांना मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. विद्युत लोकपालाची नियुक्ती करण्याकरिता आणि विद्युत लोकपालाने ग्राहकांची गाऱ्हाणी निकालात काढण्याची पध्दत आणि कालावधी, याबाबतही आयोगाने त्यात मार्गदर्शन केले आहे. ह्या विनियमांच्या आधारे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि ओम्बड्समन) विनियम, २००३ अधिक्रमित झाले आहेत.*

*केंद्र शासनाने दिनांक २६ ऑक्टोबर २००६ रोजी विद्युत (सुधारणा) नियम, २००६ अधिसूचित केले आहेत. त्यानुसार, ग्राहकांशी निगडीत बाबींची चांगली माहिती असलेला एक स्वतंत्र सदस्य ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचावर राज्य विद्युत नियामक आयोगाने नामनिर्देशीत करणे आवश्यक आहे. या सुधारणेच्या आधारे, आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ मध्ये दिनांक ०२ एप्रिल, २००७ रोजी आवश्यक त्या सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार आयोग, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचावर ग्राहकांशी निगडीत बाबींची चांगली माहिती असलेला एक स्वतंत्र सदस्य, असे पद रिक्त झाल्यावर, नामनिर्देशीत करतो.*

*विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (४) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य आयोगाने राष्ट्रीय विद्युत धोरण मार्गदर्शक धरुन आपली कार्ये पार पाडावीत. राष्ट्रीय विद्युत धोरणातील खंड ५.१३.४४ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, नियामक प्रकिया अधिक प्रभावी करण्यासाठी आयोगाने नियामक आयोगासमोरील ग्राहक गटाचे प्रतिनिधीत्व परिणामकारक करणे आणि क्षमता वाढविणे सुकर करावे. या संदर्भात, प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधींनी केलेल्या प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय आयोगाने यापूर्वीच घेतला आहे.*

## विद्युत लोकपाल (ओम्बड्समन)

विद्युत लोकपालाचे कार्यालय दिनांक २७ डिसेंबर, २००४ पासून सुरु करण्यात आले. राज्यातील ग्राहक गाऱ्हाणे मंचांकडून गाऱ्हाण्याचे निवारण न झाल्यामुळे ग्राहकांची निवेदने स्वीकारुन त्यांच्या गाऱ्हाण्यांसंदर्भात निकाल देण्याकरिता, विद्युत अधिनियम, २००३ मध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे, या कार्यालयाने लगेच कामास सुरुवात केली.

जनतेमध्ये अधिक जागृती झाली म्हणून, मागील वर्षाच्या तुलनेत, सन २००६-०७ मध्ये विद्युत लोकपालाकडे निवेदनांचा ओघ वाढला. अहवाल सालात जवळ-जवळ ८४ निवेदने प्राप्त झाली. त्यापैकी ७८ प्रकरणी निकाल देण्यात आला. मागील वर्षातील तीन निवेदनांवर देखील अहवाल सालात निकाल देण्यात आला. गाऱ्हाण्याचे निवारण करण्यासाठी विनियमांमध्ये ६० दिवसांचा कालावधी ठरविण्यात आला असला तरी एक प्रकरण निकाली काढण्यासाठी प्रत्यक्षात सरासरी ३८ दिवस लागले. यामुळे अधिनियमाखाली स्थापन करण्यात आलेल्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण यंत्रणेवरचा सामान्य ग्राहकांचा विश्वास वृध्दिंगत झाला.

विद्युत लोकपालाकडे आलेल्या आणि निकाली काढण्यात आलेल्या गाऱ्हाण्यांमध्ये बरीच गाऱ्हाणी देयकांसंदर्भात-विशेषतः जादा दंड आकारणी, देयकातील परिगणनेच्या चुका, बंद/सदोष मीटर्सच्या काळातील देयके, मीटर्समधील चुकीच्या नोंदी, जागेच्या पूर्वीच्या मालकाच्या थकबाकीची वसूली इ. बाबतची होती. काही वेळा, नवीन वीज जोडणी देण्यात होणारा विलंब, नवीन जोडणी देताना आकारांची जादा वसूली, उचित सूचनेशिवाय वीज पुरवठा खंडित करणे/तोडणे, इ. मुद्दे देखील काही ग्राहकांनी उपस्थित केले होते.

काही प्रकरणी ग्राहकांनी सेवेतील उणीवांबाबत तक्रारी केल्या. तसेच छळ, मानसिक संताप आणि नुकसानीसाठी भरपाईची मागणी केली. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकाची कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ नुसार योग्य प्रकरणी ग्राहकांना भरपाई देण्याचे अनेक आदेश पारित करण्यात आले.

विद्युत अधिनियमांतर्गत, विद्युत लोकपालाच्या कार्यालयाने, अधिनियमात अभिप्रेत असल्याप्रमाणे, ग्राहकांना गाऱ्हाण्याचे निवारण करण्यासाठी गतिमान, सुलभ व स्वस्त परंतु कार्यक्षम पर्यायी व्यवस्था खरोखरच उपलब्ध करुन दिली आहे.

# सन २००६–०७ मध्ये आयोगासमोर दाखल झालेल्या याचिका

| अ.क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | – | ०५.०४.२००६ | २००६ चा १ | पुणे मंडलातील भार नियमन शिथील करण्यासाठी झालेला अतिरिक्त खर्च हा रिलायेबिलिटी आकार म्हणून वसूल करण्यास मान्यता देणे |
| २. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | – | ०४.०४.२००६ | २००६ चा २ | ऑक्टोबर २००५ ते मार्च २००६ कालावधीकरिता अल्पकालीन वीज खरेदीस कार्योत्तर मंजूरी |
| ३. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | – | ०४.०४.२००६ | २००६ चा ३ | एप्रिल २००६ ते जून २००६ कालावधीकरिता अल्पकालीन वीज खरेदीस पूर्व–मंजूरी |
| ४. | मे बालाजी इलेक्ट्रो स्मेल्टर्स लि. | महावितरण कंपनी | २६.०४.२००६ | २००६ चा ४ | उच्च दाब खंडित व अखंडित उद्योगांकरिता भार विनियमन |
| ५. | मे बालाजी इलेक्ट्रो स्मेल्टर्स लि. | महावितरण कंपनी | २६.०४.२००६ | २००६ चा ५ | उच्च दाब खंडित व अखंडित उद्योगांकरिता भार विनियमन–त्यासंबधीचे स्पष्टीकरण |
| ६. | आयोग स्वत: | महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण | – | २००६ चा ६ | नूतनशील उर्जा स्रोतांचा दीर्घकालीन विकास आणि संबंधित नियामक चौकट |
| ७. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | – | १०.०५.२००६ | २००६ चा ७ | प्रकरण क्र. २००६/३ (एप्रिल २००६ ते जून २००६ कालावधीतील अल्पकालीन वीज खरेदीबाबत) मधील आयोगाच्या दिनांक २८.०४.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ८. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | हनिल इरा टेक्सटाइल्स | १०.०५.२००६ | २००६ चा ८ | (मे. हनिल इरा टेक्सटाइल्स लि. च्या पारेषण परवान्या–संबंधातील) प्रकरण क्र. २००५/३९ मधील दिनांक २८.०३.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ९. | आयोग स्वत: | – | – | २००६ चा ९ | मुक्त प्रवेशाच्या व्यवहारांकरिता क्रॉस सबसिडी अधिभाराची परिगणना करण्याची पद्धत |
| १०. | मे. रिन्युएबल एनर्जी डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र | महावितरण कंपनी | ०२.०५.२००६ | २००६ चा १० | सन २००२ च्या प्रकरण क्र. १७ (३) ३, ४ व ५ सह सन २००४ च्या प्रकरण क्र. ७, १५ व १६ मधील आयोगाच्या दिनांक २४ नोव्हेंबर २००३ च्या आदेशाच्या आणि दिनांक ३० सप्टेंबर, २००४ च्या स्पष्टीकरणात्मक आदेशाच्या अंमलबजावणीसाठी याचिका |
| ११. | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लिमिटेड | – | ०२.०६.२००६ | २००६ चा ११ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. च्या विस्तार व इतर विद्युत केंद्रे आणि कार्यालयांमधील तसेच नवीन परळी येथील २५० मेगावॉट व नवीन पारस येथील २५० मेगावॉट औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या वेतन गटातील कर्मचारी नेमण्यास परवानगी मागण्यासाठी याचिका |
| १२. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | – | १९.०६.२००६ | २००६ चा १२ | महावितरण कंपनी लि. ने महावितरण कंपनीच्या सर्व ग्राहकांकरिता देयकांचा भरणा करण्यासाठी १५ दिवसांचा नियत दिनांक कायम ठेवण्यासाठी, केलेली याचिका |
| १३. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | – | २७.०४.२००६ | २००६ चा १३ | विद्युत अधिनियम, २००३ कलम ५५(१) खालील काल मर्यादा वाढवून देण्यासाठी याचिका |
| १४. | रिलायन्स एनर्जी लिमिटेड | टाटा पॉवर कंपनी लि. (टीपीसी) | १०.०५.२००६ | २००६ चा १४ | टीपीसीच्या रिसिव्हिंग स्टेशन्सपैकी काही विनिर्दिष्ट केलेल्या रिसिव्हिंग स्टेशन्सवरील आरईएलने यापूर्वी परत केलेली आऊटलेट्स आरईएलला उपलब्ध करून देण्यासाठी टीपीसीला निदेश देण्याकरिता याचिका |
| १५. | रिलायन्स एनर्जी लिमिटेड | टीपीसी | १०.०५.२००६ | २००६ चा १५ | टीपीसीच्या रिसिव्हिंग स्टेशन्सपैकी काही विनिर्दिष्ट केलेल्या रिसिव्हिंग स्टेशन्सवरील आरईएलने यापूर्वी परत केलेली आऊटलेट्स आरईएलला उपलब्ध करून देण्यासाठी टीपीसीला निदेश देण्याकरिता याचिका |
| १६. | श्री. विनोदकुमार गिरधारीलाल मित्तल, (जनकल्याण सेवा समिति) | महावितरण कंपनी | २६.०६.२००६ | २००६ चा १६ | औद्योगिक आणि निवासी ग्राहकांना विद्युत पुरवठा आणि भार नियमन यात होणाऱ्या भेदभावासंदर्भात दाखल केलेली याचिका |
| १७. | आयोग स्वत: | आरईएल | – | २००६ चा १७ | मे. रिलायन्स एनर्जी लि. यांनी हाती घेतलेल्या पथदर्शक वीज मागणी व्यवस्थानाच्या योजने/कार्यक्रमातील प्रगतीचा आयोगाने स्वत: घेतलेला आढावा |
| १८. | आयोग स्वत: | महावितरण कंपनी | – | २००६ चा १८ | महावितरण कंपनीने हाती घेतलेल्या पथदर्शक वीज मागणी व्यवस्थापनाच्या योजने/कार्यक्रमातील प्रगतीचा आयोगाने स्वत: घेतलेला आढावा |
| १९. | श्री. संभाजी मोहनराव शितोळे | आरईएल | २२.०६.२००६ १८.१०.२००६ | २००६ चा १९ | सर्व्हिस लाईन कॉन्ट्रिब्युशनकरिता मे. रिलायन्स एनर्जी लिमिटेडने लावलेल्या आकारांबाबतची याचिका |
| २०. | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड | – | १०.०८.२००६ | २००६ चा २० | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडच्या (महापारेषण कंपनीच्या) आर्थिक वर्ष २००६–०७ करिता ठरविलेल्या वार्षिक महसूली गरजेचा (एआरआर) आढावा |
| २१. | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड | – | १०.०८.२००६ | २००६ चा २१ | प्रकरण क्र. २००५/४९ मधील दिनांक २८.०६.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |

| अ.क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| २२. | मे. रिलायन्स एनर्जी लिमिटेड | – | १०.०८.२००६<br>१६.११.२००६ | २००६ चा २२ | पारेषण दर चौकटी संबंधीच्या प्रकरण क्र. २००५/५८ मधील आयोगाच्या दिनांक २७.०६.२००६ च्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| २३. | श्री. एल.डी. शेठ, श्री. एस. ए. धुर्वे मे. उधालिक स्टील इंडस्ट्रिज आणि श्री. लोया हिरालाल पांडुरंग | महावितरण कंपनी | ०८.०८.२००६ | २००६ चा २३ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, १४६ आणि कलम १५० खाली दाखल केलेली तक्रार |
| २४. | आयोग स्वत: | टीपीसी | मविनिआची दिनांक १६.०८.२००६ ची नोटीस | २००६ चा २४ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १९ खाली टीपीसीने केलेल्या विजेच्या वितरणाची चौकशी. |
| २५. | रिलायन्स एनर्जी लिमिटेड | – | १५.०३.२००५<br>२४.०५.२००५ | २००६ चा २५ | आरईएल-वितरणाच्या आकारांच्या अनुसूचीला मान्यता |
| २६. | बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम | – | १८.०३.२००५<br>१५.०४.२००५<br>०३.०६.२००५ | २००६ चा २६ | बेस्टच्या आकारांच्या अनुसूचीला मान्यता |
| २७. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी | – | ३०.०८.२००६ | २००६ चा २७ | मे. लॅन्को एनर्जी प्रा. लि. यांच्या ५०० मेगावॉट टीस्टा ६ हायड्रो कडून खरेदी करावयाच्या विक्रीयोग्य विजेसाठीच्या वीज खरेदी कराराच्या मंजूरीसाठी याचिका |
| २८. | ग्लोबल एनर्जी लि. | – | ०१.०९.२००६ | २००६ चा २८ | राज्यांतर्गत व्यापार परवाना |
| २९. | गिरिजा स्टील प्रा. लि. | महावितरण कंपनी | ०७.०९.२००६ | २००६ चा २९ | एसएलसी, एससीसी आणि मीटरवरील खर्च भरणा करण्याची मागणी रद्द करणे आणि एसएलसी व एस्सीसीची वसूल केलेली रक्कम परत करणे |
| ३०. | टाटा पॉवर कंपनी | – | ०२.०५.२००५<br>११.०६.२००५ | २००६ चा ३० | टीपीसी-वितरणाच्या आकारांच्या अनुसूचीला मान्यता |
| ३१. | आयोग स्वत: | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (राज्य पारेषण कंपनी) | – | २००६ चा ३१ | राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा आर्थिक वर्ष २००६-०७ करिता पारेषण दर ठरविणे |
| ३२. | बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम | – | ११.१०.२००६ | २००६ चा ३२ | प्रकरण क्र. २००४/४ मधील दिनांक २६ सप्टेंबर, २००६ च्या पुरवणी आदेशाचे पुनर्विलोकन |
| ३३. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी | – | १९.१०.२००६ | २००६ चा ३३ | प्रकरण क्र. २००५/७० (महावितरण कंपनीच्या आकारांच्या अनुसूचीला मान्यतेबाबतच्या) दिनांक ०८.०९.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ३४. | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी | – | १०.१०.२००६ | २००६ चा ३४ | प्रकरण क्र. २००५/४८ मध्ये आर्थिक वर्ष २००६-०७ करिता ठरविलेल्या वार्षिक महसूली गरजेचे पुनर्विलोकन |
| ३५. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी | – | २०.१०.२००६ | २००६ चा ३५ | प्रकरण क्र. २००५/५४ मधील दिनांक २९ सप्टेंबर, २००६ च्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ३६. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी | – | ३१.१०.२००६<br>१०.११.२००६ | २००६ चे ३६ व ४१ | प्रकरण क्र. २००६/३१ मधील दिनांक २९ सप्टेंबर, २००६ च्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ३७. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | टीपीसी | ०७.११.२००६ | २००६ चा ३७ | (१) प्रकरण क्र. २००५ चे १२ आणि ५६ मधील दिनांक ०३.१०.२००६ च्या आदेशाने पारित केलेली टीपीसीची एआरआर आणि वीज दराची याचिका, |
| ३८. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | महावितरण कंपनी महानिर्मिती कंपनी | ०७.११.२००६ | २००६ चा ३८ | (२) सन २००५ च्या प्रकरण क्र. ४८ मधील दिनांक ०७.०९.२००६ रोजी महानिर्मिती कंपनीचा पारित केलेला आदेश आणि सन २००५ च्या प्रकरण क्र.५४ मधील दिनांक २९.०९.२००६ रोजी महावितरण कंपनीचा पारित केलेला आदेश आणि |
| ३९. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | आरईएल | ०७.११.२००६ | २००६ चा ३९ | (३) एसईझेड्चा विकासक म्हणून वीज प्राप्त करून घेण्याकरिता खास लाभ देण्याबाबतच्या सन २००५ च्या प्रकरण क्र. २५ आणि ५३ मधील दिनांक ०३.१०.२००६च्या आदेशाने पारित केलेली आरईएलची एआरआर आणि वीज दराची याचिका, या आदेशांचे पुनर्विलोकन करण्याकरिता याचिका |
| ४०. | मराठवाडा इंडस्ट्रिज असोसिएशन | महावितरण कंपनी | १३.०९.२००१<br>०१.११.२००६ | २००६ चा ४० | आयोगाच्या दिनांक २८ एप्रिल, २००० आणि ५ मे, २००० च्या आदेशाप्रमाणे एचटीपी-दोनच्या वीज दरानुसार वीज देयकात सुधारणा करण्यासाठी आणि परिणामी एचटीपी-१ च्या वीज दरानुसार वसूल केलेली जादा रक्कम मराविमंने परत करण्यासाठी याचिका |
| ४१. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | महापारेषण कंपनी टीपीसी, आरईएल,बेस्ट | ०९.११.२००६ | २००६ चा ४१ | प्रकरण क्र. २००६/३१ मधील दिनांक २९ सप्टेंबर, २००६ च्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ४२. | आयोग स्वत: | महावितरण, महापारेषण, टीपीसी, आरईएल, बेस्ट, महानिर्मिती, मुळा प्रवरा सह. सोसायटी | – | २००६ चा ४२ | महाराष्ट्रात उपलब्धतेवर आधारित वीज दर राज्य पातळीवर लावण्यास सुरूवात करणे व इतर संबंधित प्रश्न |

| अ.क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ४३. | विंध्याचल हायड्रो पॉवर लि. | महावितरण कंपनी | ०९.११.२००६ | २००६ चा ४३ | प्रकरण क्र. २००४/२५ मधील दिनांक ०९.११.२००५ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ४४. | नेटमॅजिक सोल्युशन्स प्रा. लि. | आरईएल | १७.११.२००६ | २००६ चा ४४ | प्रकरण क्र. २००५/२५ आणि प्रकरण क्र. २००५/५३ मधील रिलायन्स एनर्जी लि. च्या (आरईएल) आर्थिक वर्ष २००६-०७ च्या वीज दराच्या आदेशान्वये लावलेल्या भार व्यवस्थापन आकाराचे पुनर्विलोकन |
| ४५. | मे. वीणा दलवाई इंडस्ट्रिअल इस्टेट प्रिमाइसेस कोऑपरेटिव्ह सोसायटी लि. | आरईएल | २१.११.२००६ | २००६ चा ४५ | |
| ४६. | मुळा, प्रवरा विद्युत को-ऑपरेटिव्ह सोसायटी | – | २०.१२.२००५ | २००६ चा ४६ | मुळा प्रवरा विद्युत को-ऑपरेटिव्ह सोसायटीने प्रस्तावित केलेल्या आकारांच्या अनुसूचीला मान्यता |
| ४७. | टाटा पॉवर कंपनी लि. (टीपीसी) | – | १५.११.२००६ | २००६ चा ४७ | प्रकरण क्र. २००५/२२ आणि प्रकरण क्र. २००५/५६ मधील दिनांक ०३ ऑक्टोबर, २००६ च्या वीज दर आदेशाचे पुनर्विलोकन |
| ४८. | टाटा पॉवर कंपनी लि. | महावितरण कंपनी, महापारेषण कंपनी, आरईएल, बेस्ट | १०.११.२००६ | २००६ चा ४८ | एनटीपीसीच्या कयमकुलम प्लॅन्टमधून अल्प-मुदती करिता केलेल्या वीज खरेदीस मान्यता |
| ४९. | एम्पायर इंडस्ट्रीज लि. | टीपीसी | २७.११.२००६ | २००६ चा ४९ | प्रकरण क्र. २००५/२२ आणि प्रकरण क्र. २००५/५६ मधील टाटा पॉवर कंपनी लि. (टीपीसी)च्या आर्थिक वर्ष २००६-०७ च्या वीज दराच्या आदेशान्वये लावलेल्या भार व्यवस्थापन आकाराचे पुनर्विलोकन |
| ५०. | चेंबर ऑफ स्मॉल इंडस्ट्री असोसिएशन | महावितरण कंपनी | २९.११.२००६ | २००६ चा ५० | प्रकरण क्र. २००५/५४ मधील दिनांक २०.१०.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ५१. | मध्य रेल्वे, मुंबई | टीपीसी | ०६.११.२००६ | २००६ चा ५१ | सन २००५ च्या प्रकरण क्र. १२ व ५६ (ज्याचा क्र. २००६ चा ५१ असा आहे) मधील दिनांक ०३.१०.२००६ च्या वीज दराच्या आदेशाचे आणि प्रकरण क्र. २००५ चा ५४ (ज्याचा |
| ५२ | मध्य रेल्वे, मुंबई | महावितरण कंपनी | ०१.१२.२००६ | २००६ चा ५२ | क्र. २००६ चा ५२ असा आहे) मधील दिनांक २०.१०.२००६ च्या वीज दराच्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ५३. | असोसिएटेड कॅप्सुल्स प्रा. लि. | महावितरण कंपनी | ०२.१२.२००६ | २००६ चा ५३ | प्रकरण क्र. २००५/५४ मधील दिनांक २०.१०.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ५४. | मदुमजी पल्प ॲन्ड पेपर लि. | महावितरण कंपनी | ०२.१२.२००६ | २००६ चा ५४ | प्रकरण क्र. २००५/५४ मधील दिनांक २०.१०.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ५५. | लघु उद्योग भारती | महावितरण कंपनी | ०५.१२.२००६ | २००६ चा ५५ | प्रकरण क्र. २००५/५४ मधील दिनांक २०.१०.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ५६. | कोल्हापुर इंजिनिअरिंग असोसिएशन | महावितरण कंपनी | ०४.१२.२००६ | २००६ चा ५६ | प्रकरण क्र. २००५/५४ मधील दिनांक २०.१०.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ५७. | रिन्युएबल एनर्जी डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र | महावितरण कंपनी मेडा | ०५.१२.२००६ | २००६ चा ५७ | प्रकरण क्र. २००६/१० मधील दिनांक १२.०९.२००६ च्या आदेशाचे पालन न केल्याबाबत |
| ५८. | टाटा मोटर्स लि. | महावितरण कंपनी | ०२.१२.२००६ | २००६ चा ५८ | प्रकरण क्र. २००५/५४ मधील दिनांक २०.१०.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ५९. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | – | ०४.१२.२००६ | २००६ चा ५९ | प्रकरण क्र. २००५/५४ मधील दिनांक २०.१०.२००६च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ६०. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | – | ०४.१२.२००६ | २००६ चा ६० | एप्रिल २००६ नंतरच्या कालावधीतील इंधन-समायोजन आकारात अमान्य करण्यात आलेल्या वसूली व अन्य वीज खरेदीच्या खर्चाची छाननी |
| ६१. | इस्पात इंडस्ट्रिज लि. | महावितरण कंपनी | २२.१२.२००६ | २००६ चा ६१ | प्रकरण क्र. २००५/५४ मधील दिनांक २०.१०.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ६२. | सोलापूर ऑइल मिल ओनर्स असोसिएशन | महावितरण कंपनी | २५.१२.२००६ | २००६ चा ६२ | प्रकरण क्र. २००५/५४ मधील दिनांक २०.१०.२००६ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ६३. | महाराष्ट्र नॉन कन्व्हेन्शनल एनर्जी प्रोड्युसर्स असोसिएशन | महावितरण कंपनी | १३.११.२००६ | २००६ चा ६३ | प्रकरण क्र. २००६/६ मधील दिनांक १६.०८.२००६ आणि प्रकरण क्र. २००३/३७ मधील दिनांक ०८.०८.२००५ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
